रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २३१ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹



● प्रजासत्ताक दिनानिमित्त अलिबागमधील पोलीस परेड मैदानावर राज्याचे रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## रायगडात पावसाच्या अवकाळी सरी

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात मंगळवारी पहाटे पाच वाजताच्या सुमारास अचानक पावसाच्या अवकाळी सरी कोसळल्या. रात्रीचे थंडगार वातावरण राहिल्यानंतर सकाळी ढगांची साखळी तयार झाली आणि पहाटेच पाऊस पडल्याने नागरिकांना धावपळ करावी लागली. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील अनेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्याची नोंद असून, अनेक ठिकाणचे रस्ते ओलेचिंब झाल्याचे चित्र दिसून आले. आंबा व्यावसायिकांसह वीटभट्टी व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माघारीनंतर आता प्रचाराच्या तोफा



## 502 उमेदवारांची होणार लढत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज माघारीनंतर खऱ्या अर्थाने रणधुमाळी सुरू झाली आहे. अर्ज छाननीनंतर अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया मंगळवारी (दि. २७) सकाळी अकरा ते तीन या वेळेत पार पडली. जिल्ह्यातील ५९ जिल्हा परिषद आणि ११८ पंचायत समितीच्या जागांसाठी अंतिम ५०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यात जिल्हा परिषदेच्या १७३, तर पंचायत समितीच्या ३२९ उमेदवारांचा समावेश आहे. काही मतदार संघांमध्ये दुरंगी, तर काही मतदार संघामध्ये तिरंगी-चौरंगी लढती पाहायला मिळणार आहेत. ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून, प्रचारासाठी उमेदवारांना चार फेब्रुवारीपर्यंत वेळ मिळणार आहे.

जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेचा प्रारंभ १६ ते २१ जानेवारी या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्यापासून झाला. छाननी प्रक्रियेच्या २२ जानेवारीला १,०७२ अर्ज वैध ठरविण्यात आले, त्यात जिल्हा परिषदेच्या ३८६ आणि पंचायत समितीच्या ६८६ अर्जांचा समावेश होता. मंगळवारी (दि. २७) झालेल्या अर्ज माघारीनंतर जिल्ह्यातील ५०२ उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे.

गावबैठकीनंतर आता प्रचाराच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मागील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाने २३ जागांवर विजय मिळविला होता. या निवडणुकीत जास्तीत जास्त उमेदवार निवडून यावेत, यासाठी शेकापकडून प्रचाराला जोरदार सुरुवात करण्यात आली आहे. शेकाप महाविकास आघाडीने या निवडणुकीत नवीन चेहऱ्यांना संधी देत असताना सुशिक्षित उमेदवारांना निवडणूक लढविण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. निवडणुकीत उच्च शिक्षित व सुसंस्कृत उमेदवार असावा, यासाठी हा प्रयत्न केला आहे. गावबैठकांसह प्रचारांमुळे जिल्ह्यात शेकाप महाविकास आघाडीला अधिक यश येईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळताना दिसत आहे.

### चार फेब्रुवारीपर्यंत प्रचाराची मिळणार संधी

**कारभार संथगतीने**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने प्रशासन कामाला लागले आहे. सर्व प्रशासकीय कामकाज गतिमान व्हावे, यासाठी प्रशासनाने कायमच प्रयत्न केला जात आहे. मात्र, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवारांसह इतर माहिती जिल्हा प्रशासाकडे वेळेवर पोहोचत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे प्रशासनाचा ढिला कारभार यातून समोर आला आहे. प्रत्येक तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अंतिम उमेदवारांची यादी जिल्हा प्रशासनाकडे रात्री उशिरापर्यंत उपलब्ध झाली नाही.

**अलिबागमध्ये ६३ उमेदवार रिंगणात**

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. मंगळवारी झालेल्या अर्ज छाननीनंतर अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेसह पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अंतिम उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेसाठी २१, तर पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ४२ उमेदवार असे एकूण ६३ उमेदवार रिंगणात आहेत.

**वेगवेगळी होणार लढत**

जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ सदस्यपदांच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे. काही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघात दोन उमेदवार, तर काही मतदार संघात चार ते सहा उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक मतदार संघात पाचपेक्षा अधिक उमेदवार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे काही ठिकाणी एकमेकांविरोधात चुरशीची लढत होईल, तर काही ठिकाणी एकतर्फी विजय होईल. तर, काही ठिकाणी मतदार कोणाला कौल

**उमेदवारांवर दृष्टीक्षेप**

| तालुके | जि.प. | पं. स. |
|---|---|---|
| अलिबाग | २१ | ४२ |
| उरण | १४ | २३ |
| कर्जत | १८ | २९ |
| रोहा | १४ | २५ |
| म्हसळा | ०८ | १३ |
| मुरूड | ०५ | १३ |
| श्रीवर्धन | ०५ | १५ |
| पोलादपूर | ०६ | ०८ |
| पेण | १४ | २९ |
| सुधागड | ०४ | ११ |
| खालापूर | ११ | १७ |
| पनवेल | १८ | ४६ |
| माणगांव | १७ | २६ |
| तळा | ०५ | ०९ |
| महाड | १३ | २३ |
| **एकूण** | **१७३** | **३२९** |

### वे|ध|क

## मालवणीत गॅस सिलिंडरचा स्फोट

**मुंबई :** मालाड पश्चिमेकडील मालवणी गेट क्रमांक ८ परिसरातील एमएचबी कॉलनीत मंगळवारी सकाळी भीषण दुर्घटना घडली. सकाळी सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास एका घरात अचानक गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. या स्फोटात ६ ते ७ नागरिक गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्फोटाची तीव्रता इतकी होती की संपूर्ण परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. स्फोटानंतर मोठा आवाज झाल्याने आसपासच्या नागरिकांनी घराबाहेर धाव घेतली. स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलीस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिकांना माहिती दिली.

## शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य

**मुंबई :** वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करावी, समुद्राला वाहून जाणारे पाणी स्थानिकांसाठी तसेच महाराष्ट्रातल्या कोरडवाहू भागासाठी वापरावे, पेसा भरती सुरू करून रोजगार उपलब्ध करावा आदी मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या लॉन्ग मार्चच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळाने मंत्रालयातील बैठकीत शेतकऱ्यांची बाजू मांडली. त्यानंतर शिष्टमंडळाने वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमध्ये काही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत.




● रेवदंडा येथे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ मारुती मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, माजी जि.प. अध्यक्षा सुप्रिया पाटील, ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, जि.प. उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, पंचायत समिती उमेदवार राकेश म्हात्रे, अनया फुंडे, निलेश खोत, संदीप खोत आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिकचे वृत्त पान ३ वर

## चौलमधून महाविकास आघाडीचा शंखनाद

### आई शितळादेवीचे आशीर्वाद घेत नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात



**। चौल । विशेष प्रतिनिधी ।**

चौल मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या प्रचाराचा जोरदार आणि निर्धारपूर्ण शंखनाद मंगळवारी (दि. २७) भक्तिभावाच्या वातावरणात करण्यात आला. आई शितळादेवीचे आशीर्वाद घेत नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आई शितळादेवीच्या आशीर्वादाने सुरू झालेला हा प्रचार नक्कीच विजयाचा मार्ग दाखवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, महाविकास आघाडीचे चौल जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, चौल-वरंडे पंचायत समितीच्या उमेदवार •> पान ५ वर

## खासगी व्हिडीओवरून दोघींचे भांडण

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात एका सीआरपीएफ जवानासह चार जणांचा मृत्यू झाला. प्रवासी बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टाटा मोबाईल वाहनाला धडक दिल्याने हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. या अपघातात टाटा मोबाईल वाहनाचे टायर बदलणाऱ्या तीन नागरिकांचा जागीच मृत्यू झाला. तसेच बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका सीआरपीएफ जवानाचाही मृत्यू झाला.

## उमेदवारीचा ‘आस्वाद’ घेण्यापूर्वीच माघार

### भाजप पदाधिकाऱ्याचा शहापूरमधून अर्ज मागे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरलेली एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने शहापूर मतदारसंघातून दाखल केलेला जिल्हा परिषद उमेदवारी अर्ज मंगळवारी अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी मागे घेतला आहे. त्यामुळे उमेदवारीचा ‘आस्वाद’ घेण्यापूर्वीच माघार घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

सदरपदाधिकाऱ्यानेभाजपमध्ये प्रवेशानंतर शहापूर मतदारसंघातून जिल्हा परिषद सदस्यपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने स्थानिक राजकारणात हालचाली वाढल्या होत्या. त्यांच्या उमेदवारीकडे अनेकांचे लक्ष लागले होते. मात्र, ऐन माघारीच्या दिवशी त्यांनी अचानक घेतलेल्या निर्णयामुळे राजकीय समीकरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या माघारीमागे पक्षांतर्गत चर्चा, स्थानिक पातळीवरील राजकीय गणिते तसेच आगामी रणनीती कारणीभूत असल्याची चर्चा आहे. मात्र, संबंधित पदाधिकारी किंवा भाजपकडून याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. •> पान ५ वर

## आंबेपूरमध्ये शेकाप उमेदवारांना ठाकरे गटाचा पाठिंबा

### दहशत निर्माण करणाऱ्यांना जनताच जागा दाखविणार; छाया पिंगळे यांचा इशारा

**। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर जिल्हा परिषद मतदार संघातील निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवार पूजा अजित भगत यांना ठाकरे गटातील उमेदवार छाया पिंगळे यांनी पाठिंबा दर्शविला आहे. छाया पिंगळे यांनी स्वतःचा अर्ज मागे घेऊन त्यांनी भगत यांना पाठिंबा दर्शविला आहे. मंगळवारी सायंकाळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची भेट घेऊन पूजा भगत यांना निवडून देण्यासाठी प्रचंड मेहनत घेणार असल्याचे आश्वासन दिले. शेकापने केलेल्या विकासकामांमुळे या निवडणुकीत पूजा भगत भरघोस मतांनी निवडून येतील, असा विश्वास छाया पिंगळे यांनी व्यक्त केला.



रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंबेपूर जिल्हा परिषद मतदार संघात प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. शेकाप, महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून प्रचाराला वेग आला आहे. अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात मंगळवारी (दि. २७) उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. ठाकरे गटातील शिवसेनेच्या उमेदवार छाया पिंगळे यांनी भरलेला उमेदवारी •> पान ५ वर

## आगीत ४०० बकऱ्या होरपळल्या




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कर्जत नेरळ राज्यमार्ग रस्त्यावर माणगाव गावच्या हद्दीत असलेल्या गोट फार्ममध्ये आग लागली. या आगीमध्ये तब्बल ४०० बकऱ्यांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला. त्यात या ठिकाणी लागलेली आग ही रात्रीच्या वेळी लागल्याने मदतकार्य मिळण्यात अडचणी आल्या आणि मुख्य प्राण्यांचा बळी यात गेला आहे.


कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळजवळील माणगाव गावाच्या हद्दीत रस्त्याच्या कडेला राबिया बकरी फार्म आहे. माणगाव येथे मंगळवारी मध्यरात्री भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रात्री सुमारे •> पान ५ वर

### २४ पथकांमार्फत जिल्ह्यावर कडक नजर | जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

## कॉपीमुक्त अभियानासाठी प्रशासन सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावीच्या लेखी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा प्रशासनाने कॉपीमुक्त अभियान राबविण्यास कडक पावले उचलली आहेत. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी जिल्ह्यात २४ भरारी पथकांमार्फत संशयित हालचालींवर काटेकोर नजर ठेवली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.



जिल्ह्यात बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होत असून, १८ मार्चपर्यंत चालणार आहे. या परीक्षेसाठी ५२ केंद्रांवर परीक्षा घेतल्या जाणार आहेत. दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्चपर्यंत चालणार असून, यासाठी जिल्ह्यातील ७५ परीक्षा केंद्रांवर एकूण ३७ हजार ५७९ विद्यार्थी बसणार आहेत. कॉपीमुक्त अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर एकूण २४ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १५ पथके आणि उर्वरित जिल्हा स्तरावरील पथके कार्यरत राहणार आहेत. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची झडती घेतली जाणार असून, प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही प्रणालीचे थेट नियंत्रण जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाकडे असणार आहे.

याशिवाय, जिल्ह्यात विशेष ‘बैठक पथक’ तयार करण्यात आले असून, या पथकाद्वारे सीसीटीव्ही फुटेजची नियमित पाहणी केली जाणार आहे. कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास बैठक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन कठोर कारवाई करणार आहे. कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह कॉपीस प्रोत्साहन देणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असून, संबंधित परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

**परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश**

दरम्यान, परीक्षा केंद्रांच्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. परीक्षा काळात केंद्रांच्या आसपास प्रतिबंधात्मक आदेश लागू केले जाणार असून, झेरॉक्स दुकाने तसेच इतर संशयास्पद दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. यासोबतच ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही परीक्षा केंद्र परिसरातील हालचालींवर नजर ठेवली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि रायगड जिल्हा कॉपीमुक्त करण्यासाठी सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

## ‘ट्रान्सफॉर्मर गँग’ गजाआड

- **रायगड पोलिसांची मोठी कारवाई**
- **१० लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त; पाच आरोपी अटकेत**




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ, कर्जत, खालापूर आणि खोपोली परिसरात ट्रान्सफॉर्मर फोडून त्यातील तांब्याच्या तारांची चोरी करणाऱ्या सराईत टोळीचा रायगड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. नेरळ आणि कर्जत पोलिसांच्या संयुक्त पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे मुंब्रा (ठाणे) येथून पाच आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे १० लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. १३ जानेवारी २०२६ रोजी नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे धामोते येथील ‘डिस्कव्हर रिसॉर्ट’समोरील ट्रान्सफॉर्मर फोडून त्यातील तांब्याच्या तारा अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्या होत्या. यावेळी ट्रान्सफॉर्मरमधील ऑईल खाली सांडवून सरकारी मालमत्तेचे मोठे नुकसान करण्यात आले होते. याप्रकरणी १४ जानेवारी रोजी नेरळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३०३(२) व ३२४(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकारच्या वाढत्या चोऱ्यांची गंभीर दखल घेत रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल व अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी तपासाचे आदेश दिले. त्यानुसार नेरळ व कर्जत पोलिसांचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी वॅगन आर कारचा •> पान ५ वर

# निवडणुकीत सोशल मीडियाचा निर्णायक प्रभाव

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आता केवळ गावाच्या चौकात, सभामेळाव्यांत किंवा पोस्टर-बॅनरपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत. बदलत्या काळासोबत निवडणूक प्रचाराने डिजिटल उंची गाठली असून, सोशल मीडिया हेच प्रभावी आणि निर्णायक माध्यम ठरत आहे.

आज प्रत्येकाच्या हातात अँड्रॉइड मोबाईल आहे. याच मोबाईलच्या माध्यमातून उमेदवार थेट मतदारांच्या घराघरात पोहोचत आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, युट्यूब या प्लॅटफॉर्मवरून विकासकामांची माहिती, भावनिक संदेश, शुभेच्छा, व्हिडिओ, रिल्स, प्रचारगीते वेगाने प्रसारित होत आहेत. विशेष म्हणजे, याला खेड्यापाड्यांतूनही मोठा प्रतिसाद मिळत असून लाईक, शेअर आणि कमेंटच्या माध्यमातून मतदार सक्रिय सहभाग घेत आहेत.

काही उमेदवारांच्या मुलाखती, संवादात्मक व्हिडिओ आणि सामान्य जनतेशी थेट संवाद साधणारे रिल्स सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यामुळे कमी वेळात मोठ्या प्रमाणावर ओळख निर्माण होत आहे. पारंपरिक प्रचाराला लागणारा प्रचंड खर्च, पोस्टर-बॅनर, जाहिराती यावर येणारी आर्थिक मर्यादा पाहता सोशल मीडिया हा कमी खर्चात प्रभावी प्रचाराचा मार्ग ठरत आहे.

पोस्टर, बॅनर व वृत्तपत्रातील जाहिरातींचा खर्च निवडणूक खर्चात दाखवणे बंधनकारक असल्याने अनेक उमेदवारांनी डिजिटल प्रचाराकडे रणनीतीपूर्वक मोर्चा वळवला आहे. सोशल मीडियामुळे उमेदवार केवळ प्रसिद्धी करत नाहीत, तर मतदारांची मानसिकता, प्रतिक्रिया आणि अपेक्षा थेट समजून घेत आहेत. मात्र, या डिजिटल प्रचाराचा विजयावर नेमका किती परिणाम होईल, हे निकालानंतरच स्पष्ट होणार असले तरी एक गोष्ट मात्र ठाम आहे.

राजकारण आता चौकातून मोबाईल स्क्रीनपर्यंत पोहोचले आहे. येणाऱ्या काळात सोशल मीडिया हा केवळ प्रचाराचे साधन न राहता निवडणूक रणनीतीचा केंद्रबिंदू ठरेल, यात शंका नाही.

## पांडुरंग आंबेतकर यांचे निधन

**माणगाव** : अलिबागमधील संत रोहिदास नगर चेंढरे येथील पांडुरंग धर्मा आंबेतकर यांचे अल्पशा आजाराने शनिवारी (दि.२५) निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.



त्यांनी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे कक्षसेवक म्हणून अनेक वर्ष सेवा बजावली होती. त्यांनी अनेक गोरगरीब, गरजू रुग्णांना निस्वार्थी मदत केली होती. तसेच रुग्णालयातील कर्मचारी यांना देखील त्यांच्या कामामध्ये ते नेहमी सहकार्य करत. काही वैयक्तिक कारणासाठी त्यांनी आपण सेवा देत असलेल्या उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे स्वेच्छा राजीनामा देऊन अलिबाग येथे आपल्या गावी वडिलांचा व्यवसाय करत होते. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, एक बहीण, एक मुलगा आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच मित्र परिवाराकडून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार, दि.३ फेब्रुवारी व उत्तरकार्य शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी अलिबाग येथे होणार आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व श्री. बिपीन त्रिलोकचंद कोठारी, राहणार- एफ-१०६, मरीना, बी- वींग, कल्पतरू वॉटरफ्रंट, पनवेल, जि. रायगड-४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. देवम इंफ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार १) परेशकुमार नरसिंह सरैया २) प्रविण रणछोड पटेल ३) हरेश प्रविण गामी ४) विशाल रतनशी पटेल ५) वशराम पेथा गजोरा ६) वालजी लाधा रावत ७) प्रभुलाल नानजी पटेल ८) धरमशी भाचू बांभणिया ९) राज करसन पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २२३३ | ०९.०१.२०२६ | पुष्पक नोड | २८ | ६५ | ४१०.०० चौ. मी | १८.११.२०२५ | २६.११.२०२५<br>२७.११.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४७६/२०२५-२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. प्रशांत अनंत पालशेतकर, श्री. प्रदिप अनंत पालशेतकर व श्री. दिलीप अनंत पालशेतकर यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे वल्हवली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| १४४ | ०-२६-३० | २.१२ |
| १४५ | ०-२२-१० | २.६९ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २६/०१/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा', मु.पो.धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री.प्रशांत अनंत पालशेतकर, व श्री.प्रदिप अनंत पालशेतकर यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे वल्हवली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील**

| भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| १४७ | ०-७९-९० | ९.३८ |
| १४९ | ०-६४-०० | ७.०६ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २६/०१/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
'अन्नपूर्णा', मु.पो.धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक राजेश विनायक बागवे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ११/८ | ००-६६-००<br>या एकूण क्षेत्रापैकी बागवे यांचे मालकीच्या क्षेत्रापैकी<br>००-३५-५० हे.आर.पॉ. या मिळकतीबाबत | ०.३९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- २८ जानेवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत,जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकत विद्यमान मालक विदुला विवेक देशपांडे व विवेक वसंत देशपांडे यांचे नावे सातबारा अभिलेखामध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २२३६/१ | १-४६-७० | ७४-२२ |

पैकी विदुला विवेक देशपांडे व विवेक वसंत देशपांडे यांचे नावे सातबारा अभिलेखात नोंदविण्यात आलेले ०-०७-०० हे.आर.चौ.मी., आकार रु.३-६३ पै.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-२८/०१/२०२६

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
'गुरूकृपा''अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. सुरेश विष्णु कदम, २) कु. रोशन सुरेश कदम यांनी खालील वर्णनाची बिन शेतजमिन मिळकत त्याचे मालक १) मोनाली आशिष कणेकर, २) रुपाली सुदेश अविटकर, ३) शैलेश रमेश दप्तरदार रा.२०२, बी विंग, ओशानिक २, फियामा रेसिडेन्सी, घोडबंदर रोड, मरी आई मंदीर जवळ, मोगरपाडा, ठाणे ४००६१५यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-जिते, तालुका-कर्जत, जिल्हा रायगड येथील बिनशेती मिळकत**

| सर्वे नं./हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मीटर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|
| ११/१ | ४६.३०.०० | ४६३-०० |
| ११/२ | २.००.०० | २०-०० |
| १२/२ | २.५०.०० | २५-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दाण, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त, विकसन करारनामा, कुल अखत्यारपत्र, वैगेरे हक्क असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २७/०१/२०२६

**(रोहिदास जनार्दन मिणमिणे )**
अधिवक्ता
रा.भडवळ, पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९२०९५८१९१०/९६८९९९२४१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकत विद्यमान मालक श्री मिलींद विश्वनाथ नागवेकर, श्री दिलीप विश्वनाथ नागवेकर, श्री शुभम राजेश म्हात्रे, श्रुतीका प्रफुल्ल म्हात्रे, यांचेकडून खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| १८१५/३ | ०-०६-०० | १-४० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-२७/०१/२०२६

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
'गुरूकृपा' 'अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे चिंचोटी ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गट नंबर ९६ क्षेत्र ०-१४-७० हे. आर., पो. ख. ०-०२-५० हे. आर., एकूण क्षेत्र ०-१७-२० हे. आर., आकार ०.८७ रू. पैसे ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र धर्मा पाटील वगैरे मु. चिंचोटी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २७/०१/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि.रायगड.

## जाहीर सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, मी, **रामचंद्र धर्मा घरत,** भारतीय रहिवासी, प्रौढ, ज्यांचा पत्ता मापगाव, अलिबाग, रायगड-४०२२०१, खालील **पहिल्या परिशिष्टात** सविस्तर वर्णन केलेल्या जमिनीचा आणि त्यावरील उभे असलेल्या बांधकामांचा (यापुढे **"सदर मिळकत"** म्हणून उल्लेख) पूर्ण मालक आहे आणि मला त्याचा पुरेसा हक्क आहे.

माझ्याकडून खालील **दुसऱ्या परिशिष्टात** नमूद केलेली मूळ कागदपत्रे (यापुढे **"मूळ कागदपत्रे"** म्हणून उल्लेख) हरवली आणि/किंवा गहाळ झाली आहेत. योग्य ती काळजी घेऊन आणि शोध घेऊनही ती मला सापडलेली नाहीत.

मी मूळ कागदपत्रे हरवल्याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी तक्रार क्र. ११३२ सन २०२५ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

सदर मिळकतीच्या संदर्भातील मूळ कागदपत्रांच्या ठावठिकाण्याबद्दल कोणालाही काही माहिती असल्यास किंवा ती कोणाच्या ताब्यात असल्यास, त्यांनी याद्वारे या प्रकाशनाच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत माझ्या निवासस्थानी, पत्ता: **मापगाव, अलिबाग, रायगड – ४०२२०१** येथे कागदोपत्री पुराव्यासह लेखी नोटीस देणे आवश्यक आहे.

**वरील संदर्भातील पहिले परिशिष्ट**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

मौजे भिसराई, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित असलेली व वसलेली, गट नं. १०६, हिस्सा नं. २/१, ज्याचे क्षेत्रफळ २४.३० आर (साधारणपणे २,४३० चौरस मीटर किंवा त्यासुमारास) असलेली शेतजमीन, त्यावरील उभ्या असलेल्या बांधकामासह, जिच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत,–

उत्तरेस किंवा उत्तरेकडे : गट नं. १०६ हिस्सा नं. १ ची जमीन
दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे : अंशतः गट नं. १०६ हिस्सा नं. २/२ ची जमीन आणि अंशतः गट नं. १०९ ची जमीन
पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे : गट नं. १०७ ची जमीन
पूर्वेस किंवा पूर्वेकडे : अंशतः गट नं. ९३अ ची जमीन आणि अंशतः गट नं. १०६ हिस्सा नं. २/२ ची जमीन

**वरील संदर्भातील दुसरे परिशिष्ट**
**(मूळ कागदपत्रांची यादी)**

१. दिनांक १६ जून २००९ रोजीचे हक्कसोड पत्र जे दुय्यम निबंधक कार्यालय, अलिबाग येथे २००९ च्या अनुक्रमांक १९२८ अन्वये नोंदणीकृत आहे. जे रघुनाथ धर्मा घरत, शारदा रामचंद्र दळवी, संगीता सखाराम राणे, विद्या कृष्णा पाटील, सुनंदा अनंत घरत, चंद्रकांत अनंत घरत, अपर्णा गोपीनाथ पाटील आणि पुष्पा विजय दळवी यांनी रामचंद्र धर्मा घरत आणि लक्ष्मण अनंत घरत यांच्या लाभात करून दिले होते.
२. दिनांक ९ एप्रिल २०१३ रोजीचे वाटप पत्र जे दुय्यम निबंधक कार्यालय, अलिबाग येथे २०१३ च्या अनुक्रमांक १३२३ अन्वये नोंदणीकृत आहे. जे रामचंद्र धर्मा घरत आणि लक्ष्मण अनंत घरत यांच्यामध्ये झाले होते.

**दिनांक: २८ जानेवारी, २०२६**

**सही/–**
**रामचंद्र धर्मा घरत**

## जाहीर सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, आमचे अशील यांनी आम्हांस, **रामचंद्र धर्मा घरत,** वयाने प्रौढ, भारतीय रहिवासी, राहणार – मापगाव, अलिबाग, रायगड – ४०२२०१, यांच्या जमिनीचे व त्यावर उभ्या असलेल्या बांधकामाचे, ज्याचे सविस्तर वर्णन खालील **पहिल्या परिशिष्टात** केले आहे (**"सदर मिळकत"**), टायटल तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

रामचंद्र धर्मा घरत यांनी आमच्या अशीलांना असे कळविले आहे की, खालील **दुसऱ्या परिशिष्टात** नमूद केलेली मूळ कागदपत्रे हरवली आहेत आणि/किंवा गहाळ झाली आहेत आणि पुरेसा शोध घेऊनही ती त्यांना मिळून येत नाहीत. तसेच सदर कागदपत्रे कोणत्याही व्यक्तीकडे किंवा व्यक्तींकडे, बँकांकडे आणि/किंवा वित्तीय संस्थांकडे, त्यांवर कोणतेही गहाण, तारण, बोजा आणि/किंवा धारणाधिकार निर्माण करण्याच्या उद्देशाने ठेवलेली किंवा जमा केलेली नाहीत.

सदर मिळकतीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागावर, कोणत्याही व्यक्तीचा विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल, वाटप, बोजा, दायित्व, भाडेहक्क, पोट-भाडेहक्क, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, परवाना, गहाण, वारसाहक्क, ताबा, कब्जा, हिस्सा, बक्षीस, धारणाधिकार, निर्वाह, सुखभोग, विश्वस्त, हक्कदर्शक दस्त, अटी/करार, हक्कसोड, हक्कत्याग किंवा इतर कोणत्याही पद्धतीने, कोणत्याही कराराद्वारे, दस्ताद्वारे, दस्तऐवजाद्वारे, लेखाद्वारे, अभिहस्तांतरण पत्राद्वारे, मृत्युपत्रीय इच्छेद्वारे, मृत्युपत्राद्वारे देणगीद्वारे, उत्तराधिकाराने, कौटुंबिक व्यवस्थेनुसार / तडजोडीनुसार, दाव्याद्वारे, कोणत्याही न्यायालयाच्या हुकूमनाम्याद्वारे किंवा आदेशाद्वारे, कंत्राटाद्वारे / कराराद्वारे, विकास हक्क किंवा एफएसआय / टीडीआर च्या वापराद्वारे, बोजा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, कोणत्याही स्वरूपाचा हिस्सा, हक्क, मालकी, संपदा, हितसंबंध, दावा, हरकत आणि/किंवा मागणी असल्यास, त्यांनी याबाबतची सूचना लेखी स्वरूपात व कागदपत्रांच्या पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांना, आमच्या कार्यालयात: **२रा मजला, एन.एम. वाडिया बिल्डिंग, १२३ एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई ४००००१** येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत द्यावी आणि त्याची एक प्रत **bhakti.mehta@wadiaghandy.com** येथे पाठवावी. कसूर केल्यास, असा कोणताही हिस्सा, हक्क, मालकी, लाभ, हितसंबंध, दावा, हरकत आणि/किंवा मागणी विचारात घेतली जाणार नाही आणि ती माफ केली आहे आणि/किंवा सोडून दिली आहे असे मानले जाईल.

**वरील संदर्भातील पहिले परिशिष्ट**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

मौजे भिसराई, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित असलेली, गट क्र. १०६ हिस्सा क्र. २/१, क्षेत्र २४.३० आर (सुमारे २,४३० चौरस मीटर किंवा त्या दरम्यान समतुल्य) असलेली शेतजमीन, त्यावर उभ्या असलेल्या बांधकामासह, असा सर्व तो तुकडा आणि भाग, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत,

उत्तरेस किंवा उत्तरेकडे : गट क्र. १०६ हिस्सा क्र. १ ची जमीन.
दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे : अंशतः गट क्र. १०६ हिस्सा क्र. २/२ ची जमीन आणि अंशतः गट क्र. १०९ ची जमीन.
पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे : गट क्र. १०७ ची जमीन.
पूर्वेस किंवा पूर्वेकडे : अंशतः गट क्र. ९३अ ची जमीन आणि अंशतः गट क्र. १०६ हिस्सा क्र. २/२ ची जमीन.

**वरील संदर्भातील दुसरे परिशिष्ट**
**(मूळ कागदपत्रांची यादी)**

१. रघुनाथ धर्मा घरत, शारदा रामचंद्र दळवी, संगीता सखाराम राणे, विद्या कृष्णा पाटील, सुनंदा अनंत घरत, चंद्रकांत अनंत घरत, अपर्णा गोपीनाथ पाटील आणि पुष्पा विजय दळवी यांनी रामचंद्र धर्मा घरत आणि लक्ष्मण अनंत घरत यांच्या लाभात करून दिलेले, दिनांक १६ जून २००९ रोजीचे अलिबाग येथील दुय्यम निबंधक कार्यालयात २००९ च्या अनुक्रमांक १९२८ अन्वये नोंदणीकृत झालेले हक्कसोड पत्र.
२. रामचंद्र धर्मा घरत आणि लक्ष्मण अनंत घरत यांच्या दरम्यान झालेले, दिनांक ९ एप्रिल २०१३ रोजीचे अलिबाग येथील दुय्यम निबंधक कार्यालयात २०१३ च्या अनुक्रमांक १३२३ अन्वये नोंदणीकृत झालेले वाटप पत्र.

दिनांक: २८ जानेवारी २०२६

**वाडिया घांदी आणि कं. करीता**
**भक्ति एम. मेहता**
**भागीदार**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे - मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे मालक १. चांगदेव रामचंद्र गवळी २. परमेश्वर भगवानराव लाबूंटे ३. पूनम रमेश संकपाळ ४. मयुरा सहदेव भोसले ५. अनिल मोहनराव घाडगे ६. गोविंद माधवराव मुंडकर यांचेकडून विकसीत करणेकरीता घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर/ प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १६/१/अ/५ | ६९०-० ० चौ.मी. | १३-८० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिलांकडून वरील मिळकतीबाबत विकसनाचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २८/०१/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे रांजणपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील श्री.रघुनाथ पांडूरंग मोहिते, यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती अलिबाग पैकी ग्रुपग्रामपंचायत आवासच्या हद्दीतील मौजे रांजणपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| रांजणपाडा | १०२ | ०-४४-५०<br>पो.ख.०-०९-१०<br>०-५३-६० | १२.९४ |

तसेच त्या मिळकतीमध्ये येण्या-जाण्यासाठी मौजे रांजणपाडा गट नं.१००, ३५ व ३४ या मिळकतींतून जाणाऱ्या रस्त्याच्या वापराच्या हक्कासह.

अलिबाग
तारीख : २८/१/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## नोटीस
## साठेखत करारा पत्र गहाळ झालेबाबत....

श्री.आयास अब्दुलगणी शेख, राहणार- मु.पो.पाली, ता.सुधागड, जि. रायगड येथील कायम रहिवाशी आहेत. सध्या ते रामआळी (पाली) येथे श्री रामनिवास बिल्डिंगमध्ये रूम नं.२ मध्ये राहत आहेत.

श्री.आयास अब्दुलगणी शेख, यांना श्री रामनिवास बिल्डिंगमध्ये सदर राहत असणारी रूम नं.२ ही श्री.वैभव दपके यांच्या मालकीची आहे. सदरील श्री रामनिवास बिल्डिंगमध्ये सदर राहत असणारी रूम नं.२ ही श्री. आयारा अब्दुलगणी शेख यांना खरेदी करायची होती. यामुळे श्री.आयास अब्दुलगणी शेख आणि श्री.वैभव दपके यांच्यात खरेदी व्यवहार ठरवून प्रथम साठेखत करार दस्त क्रमांक ३८५/२०२६ दि.१९/०१/२०२६ रोजी झाला आहे.

सदरील साठेखत करार दस्त मुळप्रत श्री.वैभव दपके यांनी श्री.आयारा अब्दुलगणी शेख यांच्याकडे ठेवण्यासाठी दिला होता. परंतू सदरील साठेखत करार दस्त मुळप्रत प्रवासात श्री.आयास अब्दुलगणी शेख यांच्याकडून गहाळ झाले आहे. तरी कोणत्याही व्यक्तीला हे साठेखत करार दस्त मुळप्रत मिळाल्यास श्री. आयारा अब्दुलगणी शेख यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन या नोटीसद्वारे करण्यात येत आहे.

ठिकाण- पाली
दिनांक - २७/०१/२०२६

सही
**श्री. आयास अब्दुलगणी शेख**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.हितेश रामप्रकाश चटवाल व इतर-४ | १२६/७/अ | ००-८२-०० | ०-४७ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २८/०१/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्रीम.आशा शंकर गोरे | ४० | खाता क्र.-३७८ मधील एकुण क्षेत्र १-३०-०० हे. आर. पॉ. यापैकी विकत देणार यांचे अविभक्त हिस्स्याचे विक्री क्षेत्र ००-३०-०० हे.आर.पॉ. | १-०१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २८/०१/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

राजकीय फेरफटका

# चौलमध्ये बसणार गद्दारीला लाथ

मतदार देणार निष्ठेला साथ!

चौल जिल्हा परिषद मतदारसंघातील निवडणूक यंदा केवळ आकड्यांची किंवा उमेदवारांची लढाई राहिलेली नाही. ही निवडणूक म्हणजे निष्ठा विरुद्ध गद्दारी, स्थानिकांचा हक्क विरुद्ध दलाली आणि खरा विकास विरुद्ध खोट्या श्रेयलाटेचा थेट संघर्ष ठरला आहे. या संघर्षात शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस आणि मनसेचे- महाविकास आघाडीचे उमेदवार, माजी जिल्हा परिषद सदस्य आणि विरोधी पक्षनेते सुरेंद्र मोरेश्वर म्हात्रे हे अत्यंत ठाम, स्पष्ट आणि रोखठोक भूमिकेत समोर आले आहेत. प्रचारादरम्यान त्यांनी चौल मतदारसंघातील ज्वलंत प्रश्नांवर निर्भीडपणे भाष्य केले आहे.



चौल, नागाव आणि रेवदंडा या तीन प्रमुख गावांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आजही गंभीर आहे. उमटे धरणावर जवळपास १ लाख लोक रोज अवलंबून असतानाही अनेक भागांत आजही नळाला पाणी नाही, ही वस्तुस्थिती लपवून चालणार नाही, असे सुरेंद्र म्हात्रे यांनी ठामपणे सांगितले. मागील जिल्हा परिषद कार्यकाळात उमटे धरणातील गाळ काढणे, धरणाचे मजबुतीकरण करणे आणि घरोघरी नळाद्वारे पाणी पोहोचवण्याची योजना अंतिम टप्प्यात असताना, जिल्हा परिषद बरखास्त झाली. त्यानंतर प्रशासकीय राजवट आल्याने हा प्रश्न मागे पडला. मात्र, आता जनता प्रतिनिधी म्हणून निवडून आल्यावर हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी ठोस पावले उचलणार, असा शब्द त्यांनी दिला. उमटे धरणाच्या दुरुस्तीसाठी १०० कोटींचा निधी मंजूर झाला, त्यातील ८-१० कोटींचे काम केल्याचे सांगण्यात आले; परंतु, कधी आणि कुठले काम केले हे शोधण्याची वेळ आल्याचा आरोप त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केला. पाण्यासाठी जाहीर झालेल्या निधीचा हिशेब जनतेसमोर यायलाच हवा, असेही ते म्हणाले.

पर्यटनाच्या बाबतीत चौल मतदारसंघाला अफाट संधी आहेत. वेगाने वाढणारे पर्यटन, चौल परिसरातील कृषी पर्यटन, नारळ-पोफळीच्या बागा, समृद्ध निसर्गसंपदा आणि तब्बल साडेतीनशे मंदिरेही चौलची खरी ओळख आहे. मात्र, या पर्यटनाचा फायदा स्थानिक युवक, महिला आणि छोटे व्यावसायिकांना मिळण्याऐवजी दलाल प्रवृत्तीच्या लोकांच्या हातात जात असल्याची खंत सुरेंद्र म्हात्रे यांनी व्यक्त केली. पर्यटनाच्या नावाखाली वाड्या-वस्त्या उद्ध्वस्त केल्या जात आहेत, शेती भकास केली जात आहे आणि स्थानिकांना त्यांच्या हक्काच्या जमिनींपासून दूर लोटण्याचा प्रयत्न सुरू आहे. मोठे रिसॉर्ट आणि पॉश हॉटेल्स उभे राहात असताना, स्थानिकांचे छोटे कॉटेज व्यवसाय उद्ध्वस्त होत आहेत. हा अन्याय कदापि सहन केला जाणार नाही.



चौलची जमीन ही चौलकरांची आहे, हा स्पष्ट आणि ठाम इशारा सुरेंद्र म्हात्रे यांनी दिला.

आरोग्य व्यवस्थेची दयनीय अवस्था असून, याविरोधात आवाज उठवण्याचा इशारा त्यांनी दिला. रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रावर दोन जिल्हा परिषद मतदारसंघांतील सुमारे ९० हजार नागरिक आणि आसपासच्या १० हजार नागरिकांचा भार आहे. जवळपास १ लाख लोक अवलंबून असलेले हे केंद्र आज मूलभूत सुविधांशिवाय चालते आहे. मागील कार्यकाळात जीर्ण इमारत पाडून सर्व सुविधांनी सुसज्ज नवे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याचा ठराव मांडण्यात आला होता. दुर्दैवाने प्रशासकीय राजवटीमुळे तो प्रश्न मागे पडला. मात्र, यावेळी हा प्रश्न पूर्ण करूनच दाखवणार, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आयुष्यभर कष्ट करून कुटुंब आणि गाव उभे करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना शांतता, सन्मान आणि माणुसकी मिळावी, ही माझी जबाबदारी आहे. त्यांच्यासाठी हिरवळ, सावली, बसण्याची सोय असलेले 'नानानानी पार्क' उभारले जाणार आहेत. हे पार्क केवळ मोकळी जागा नसून, ज्येष्ठांच्या आयुष्याला दिलेला मान असेल, अशी त्यांची भूमिका आहे.

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या विळख्यात अडकलेली आजची तरुण पिढी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत होत चालली आहे. त्यामुळे चौल मतदारसंघातील विविध गावांत तरुणांसाठी ओपन जिम उभारण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला आहे. त्याचबरोबर आधुनिक डिजिटल युगाची गरज ओळखून मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. वर्क फ्रॉम होम, डिजिटल रोजगार, ऑनलाइन शिक्षण या संधींपासून चौलचा युवक मागे राहू नये, हे त्यांचे स्वप्न आहे.

विकासकामांच्या श्रेयावर सुरू असलेल्या नौटंकीवर सुरेंद्र म्हात्रे यांनी थेट बोट ठेवले. चौल, नागाव आणि रेवदंडामधील कोट्यवधी रुपयांची अनेक कामे शिवसेना एक असताना, तत्कालीन पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या काळात मंजूर झालेली आहेत. आज तीच कामे सुरू असताना त्यांचे श्रेय घेण्यासाठी बॅनरबाजी सुरू आहे. मंजूर कामांसाठी कोणताही संघर्ष न करता, पक्षप्रवेश करून त्याग केल्याचा आव आणणे म्हणजे जनतेच्या बुद्धीची थट्टा आहे.

आग्राव रस्त्याचा प्रस्ताव आम्ही २०२२ मध्ये देऊन २०२४ मध्ये मंजूर झाला असताना, जुलै २०२५ मध्ये पक्षप्रवेश करून या रस्त्यासाठी प्रवेश केला, असे सांगणे म्हणजे आयत्या पिठावर रेघा ओढण्याचा प्रकार असल्याचे सांगत त्यांनी शिंदे गटाचा उमेदवार सचिन राऊळचा समाचार घेतला. स्वतःच्या विकासासाठी, स्वतःची इमारत, व्यवसाय किंवा राजकीय सोय वाचवण्यासाठी केलेला पक्षप्रवेश म्हणजे जनतेच्या विकासाशी केलेली गद्दारी असल्याचे देखील ते म्हणाले.

विकासाच्या नावाखाली पक्ष बदलणे म्हणजे जनतेच्या विश्वासाशी केलेली गद्दारी आहे. ज्या पक्षाने नाव, ओळख आणि संधी दिली, ताकद दिली, त्याच पक्षाशी गद्दारी करून विकासाच्या नावाखाली दुसऱ्या पक्षात जाणे ही नैतिकतेची पायमल्ली आहे. विकास हा पक्ष बदलून नाही, तर जनतेसाठी संघर्ष करून साधला जातो, असेही त्यांनी ठासून सांगितले.

सुरेंद्र म्हात्रे यांची राजकीय भूमिका स्पष्ट आहे. एक विचार, एक पक्ष आणि एक निष्ठा. बाळासाहेब ठाकरे हे त्यांचे आदर्श असून, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शि वसेनेचे विचार घेऊन ते काम करत आहेत. कोणतेही खोटे आमिष न दाखवता, कोणतीही गद्दारी न करता समाजाचे काम करायचे, गोरगरीबांना मदतीचा हात द्यायचा आणि जे मिळेल त्यात समाधान मानायचे, हा त्यांचा राजकीय आणि वैयक्तिक मंत्र आहे.

पाणी, आरोग्य, रस्ते, पर्यटन, शेती, तरुण, ज्येष्ठ नागरिक, व्यसनमुक्ती, जमीन संरक्षण आणि प्रामाणिक विकास या सगळ्या मुद्द्यांवर ठामपणे काम करून चौल मतदारसंघाचा सर्वांगीण आणि न्याय्य विकास साधण्याचा त्यांचा निर्धार आहे. चौल, नागाव, रेवदंडा, वरंडे, देवघरची जनता सुज्ञ आहे. ती विकास आणि दलाली, निष्ठा आणि गद्दारी यातील फरक ओळखते. याच विश्वासावर 'चौलमध्ये गद्दारीला लाथ आणि निष्ठेला साथ' देण्याचे आवाहन सुरेंद्र मोरेश्वर म्हात्रे यांनी केले आहे.

## स्वतःची इमारत वाचवण्यासाठी पक्षप्रवेश!

ज्यांनी आता दोन-तीन महिन्यांपूर्वी प्रवेश केला, ते सांगतात आम्ही ही कामे मंजूर करुन आणली. खोटं बोलण्याला काही सीमा असते, हे त्यांनी जाणायला हवे. चौलचा विकास करणारे काय सांगताहेत, आम्ही कामे मंजूर करुन आणली आहेत. तुम्हाला माहितीसाठी सांगतो, माझ्याकडे वर्कऑर्डर आहेत. चौल-आग्राव रस्त्यावरुन जे मोठेपणाने, छाती फुगवून सांगत आहेत, आम्ही काम आणले, त्यांना मी एकच सांगतो, हे काम मी २०२४ मध्ये मंजूर करुन आणले आहे. चार कोटी २० लाख रुपयांचे आणि आता समोरचे उमेदवार आहेत, त्यांनी जुलै २०२५ ला प्रवेश केला. म्हणजे साधारण दीड वर्षांनंतर प्रवेश केला. आणि, ते सांगतात, आग्रावच्या रस्त्यासाठी मी प्रवेश केला. त्यांना आग्रावच्या रस्त्यासाठी प्रवेश नव्हता केला, त्यांनी स्वतःचं घर वाचवण्यासाठी, स्वतः बांधलेली नागाव ऑफिसजवळील रस्त्यावरची इमारत वाचवण्यासाठी प्रवेश केला आहे, हे येथील सर्वसामान्य जनतेला आतातरी कळायलाच हवे. आश्चर्याचे म्हणजे, त्यांनी स्वतः येऊन मला सांगगिले होते, माझ्यासमोर कबुली दिली होती की, आमदार मला धमकवत आहे, जर मी शिंदे गटात प्रवेश नाही केला, तर इमारत पाडण्यात येईल.

## विकासकामांची फक्त नौटंकी

ज्या पक्षाने नाव दिले, सर्व काही दिले, त्याच्यासोबत यांनी गद्दारी केली. स्वार्थासाठी पक्षप्रवेश करुन आज विकासासाठी पक्षप्रवेश केल्याची नौटंकी सुरू आहे. परंतु, येथील जनता दूधखुळी मुळीच नाही, अशा गद्दाराला त्याची जागा दाखवून देईल. कारण, मी कोणत्याही आमिषासाठी माझी पक्षाबरोबरची निष्ठा गहान ठेवली नाही. निष्ठावंत म्हणून एक निष्ठ आहे. माझा एकच पक्ष, एकच नेता, आणि एकच विचार करुन मी आयुष्यभर जगलो आहे. बाळासाहेब माझे आदर्श आणि ते माझे दैवत आहेत, आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवानेते आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे विचार घेऊन मी पक्षात काम करतोय. त्यामुळे एक विचार घेऊन जो जातो, तोच जनतेचे काम करु शकतो, स्वतःच्या स्वार्थासाठी जाणारा, दुसऱ्याचे-जनतेचे काम करु शकत नाही. माझा कुठलाही स्वार्थ नाही. माझी तळमळ आहे, समाजाचे काम करायचं, गोरगरीबांचे, अडचणीत असलेल्यांना मदतीचा हात देण्याचे आणि जे जे मिळेल, त्याच्यात समाधान मानायचे. तुम्ही फक्त समाजाचे काम दाखवायचे आणि आपली घरे, बंगले, माड्या उभारण्याचे काम मी केलेले नाही. खोटे आमिष दाखवून मी कोणाला फसवण्याचा काम केलेले नाही. आयुष्यात करणार नाही.

## तरुणांना व्यसनाधीन करण्याचा प्रयत्न

राजकारणासाठी तरुणांना व्यसनाधीन करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत गंभीर असल्याचे सुरेंद्र म्हात्रे म्हणाले. मते मिळवण्यासाठी दारू पार्ट्या, व्यसनांचे आमिष आणि काही ठिकाणी ड्रग्सपर्यंत मजल गेल्याच्या तक्रारी दुर्लक्षित करता येणार नाहीत. ही उद्याची पिढी म्हणजे आपल्या गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे आणि देशाचे भविष्य आहे. या पिढीला बरबाद करण्याचा कोणताही प्रयत्न कदापि खपवून घेतला जाणार नाही. गरज पडली तर राजकारणाच्या पलीकडे जाऊनही या घाणेरड्या प्रवृत्तींना थांबवणार, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# रेवदंडा येथे आघाडीच्या प्रचाराला सुरुवात

**|| जयंत पाटील, सुप्रिया पाटील यांची प्रमुख उपस्थिती || उमेदवारांनी घेतले आप्पासाहेबांचे आशीर्वाद**

**| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने रेवदंडा येथे धडाकेबाज आणि शक्तिप्रदर्शनासह प्रचाराचा शंखनाद केला. रेवदंडा येथील पारनाका मारुती मंदिरात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराची औपचारिक सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात जयंत पाटील यांच्यासह सुप्रिया पाटील यांच्या उपस्थितीमुळे वातावरण अत्यंत उत्साही झाले होते.

प्रचार सुरू करण्यापूर्वी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी व उमेदवारांनी आप्पासाहेब धर्माधिकारी यांची निवासस्थानी सदिच्छा भेट घेत आशीर्वादही घेतले. या कार्यक्रमाला शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप नेते द्वारकानाथ नाईक, सदाशिव मोरे, बाबू मोरे, महाविकास आघाडीचे जिल्हा परिषद उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, पंचायत समिती चौल-वरंडे उमेदवार अनया फुंडे, रेवदंडा-नागाव पंचायत समिती उमेदवार राकेश म्हात्रे, शेकापचे शहराध्यक्ष निलेश खोत, सोनाली मोरे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, संदीप खोत, अमित फुंडे, सुरेश खोत, राजेंद्र ठाकूर, विजय ठाकूर, विजय चौलकर, अजित गुरव, निलेश म्हात्रे, मारुती भगत, निलेश गाडे, अशोक नाईक, तसेच काँग्रेसचे अशोक अंबुकर, आशिष गोंधळी यांसह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. उपस्थित कार्यकर्त्यांनी 'महाविकास आघाडीचा विजय असो', 'महाविकास आघाडी जिंदाबाद', 'लाल बावटे की जय', 'शिवसेना जिंदाबाद' अशा घोषणांमधून परिसर दणाणून टाकला. या धडाकेबाज सुरुवातीमुळे रेवदंडा व परिसरातील प्रचाराला जोर मिळाल्याचे स्पष्ट झाले.














# शेकापच्या प्रचाराला उदंड प्रतिसाद

**| हमरापूर | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाचे वडखळ जिल्हा परिषद गटाचे उमेदवार संजय जांभळे व पेण पंचायत समिती गणाचे उमेदवार ललिता म्हात्रे यांच्या प्रचाराचा शुभारंभ वडखळ येथील धायरेश्वर मंदिरामध्ये नारळ वाढवून करण्यात आला. या कार्यक्रमाला शेकडो ग्रामस्थांनी उपस्थित राहून उदंड प्रतिसाद दिला.



या प्रसंगी बोलताना संजय जांभळे म्हणाले की, आजची हि गर्दी शेकापच्या उमेदवारांना बहुमताने निवडून देण्यासाठी जमली आहे. अकार्यक्षम विरोकांना सागरवाडीच्या ग्रामस्थांनी हकलवुन लावले, आता जनता जागृक झाली आहे. मागील ५ वर्षांत जनतेच्या समस्या न सोडवणाऱ्यांना या निवडणुकीत मतदार घरी बसवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, वाशी खारेपाटातील जनसामान्यांना पाण्यापासून वंचित ठेवण्याचे पाप हे सत्ताधाऱ्यांचे आहे. आमदार रवींद्र पाटील, खासदार धैर्यशील पाटील हे दोन्ही लोकप्रतिनिधी वाशी पाणी प्रश्नी जनतेची दिशाभूल करीत आहेत. आदानी-अंबानी सारख्या उद्योगपतींच्या घशात येथील सुपीक जमिनी घालण्याकरिता पाणी न देण्याचे षडयंत्र सत्ताधारी करीत असल्याचा आरोप देखील संजय जांभळे यांनी यावेळी केला.

तर, शेकापचे खजिनदार अतुल म्हात्रे यांनी, येत्या ७ तारखेला जिल्हा परीषद निवडणूकीत जांभळे व पंचायत समितीचे उमेदवार ललिता म्हात्र हे बहुमतांनी निवडून येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, मुख्यमंत्री पेणला तिसरी मुंबई करण्याची घोषणा दावोसमध्ये करतात; परंतु, येथील स्थानिकांना त्याचा किती फायदा होईल, हा संशोधनाचा विषय आहे. जवळच असलेल्या जे.एस.डब्लू. कंपनीत आजही स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होत नाही. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून आम्ही तरुणांना रोजगार मिळवून देण्याकरिता रोजगार मेळावे घेतो व त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो, असेही त्यांनी सांगितले.

# मविआच्या उमेदवारांचे उत्साहात स्वागत



**| रसायनी | प्रतिनिधी |**

वासांबे जिल्हा परिषद गट व मोहोपाडा पंचायत समिती गणासाठी शिवनगर, आळी आंबिवली, नविन पोसरी व परिसरात मतदारांकडून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. तसेच, कार्यकर्त्यांच्या उत्साह पाहता महाविकास आघाडीचा विजय निश्चित असल्याचे जाणकारांकडून व्यक्त होत असून, हा विकासात्मक जनसमर्थनाचा कौल असल्याचेही बोलले जात आहे. यावेळी महिला, युवक तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उमेदवारांच्या प्रचारार्थ रस्त्यावर उतरले होते. यादरम्यान, जनतेच्या डोळ्यांत महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होण्याची आशा, मनात विश्वास दिसून येत होती. प्रचारादरम्यान ग्रामस्थ महिलांकडून औक्षण करत उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

## उरणमध्ये मविआची भाजपला टक्कर

**उरण :** तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ४ आणि पंचायत समितीच्या ८ अशा एकूण १२ जागांसाठी निवडणूक होत आहे. जि.प.च्या ४ जागांसाठी सुरुवातीला २९ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी १३ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता १६ उमेदवार रिंगणात आहेत. पंचायत समितीच्या ८ जागांसाठी ४६ अर्ज आले होते. त्यापैकी २ अर्ज बाद झाले आणि २१ उमेदवारांनी माघार घेतली. आता २३ उमेदवार मैदानात उरले आहेत. त्यामुळे उरणमध्ये ही निवडणूक प्रामुख्याने महाविकास आघाडी विरुद्ध भारतीय जनता पक्ष अशी थेट आणि अटीतटीची होणार आहे. आघाडीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार), शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे) व मनसे या घटक पक्षांचा समावेश आहे.

## बोर्लिपंचयतन येथून शेकापचा विजय नक्की

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यात २ जिल्हा परिषद जागांसाठी ९ उमेदवार व ४ पंचायत समिती जागांसाठी २४ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. उमेदवारी माघारीची अंतिम तारीख दि.२७ जानेवारी असल्याने कुठला उमेदवार अर्ज माघारी घेतोय, याची उत्सुकता लागली होती. दरम्यान, बोर्लीपंचतन जि.प. मतदारसंघात २ उमेदवारांपैकी कोणीच अर्ज मागे घेतला नाही. तर, आराठी जि.प. मतदारसंघातील ७ पैकी ४ उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतला. पंचायत समिती मतदार संघात दिघी येथील १० पैकी ५ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. तसेच, बोर्लीपंचतन येथे ६ पैकी दोघांनी अर्ज मागे घेतले. आराठी येथील ५ पैकी दोघांनी तर बागमांडला येथे ५ पैकी २ उमेदवारांनी माघार घेतली. बोर्लीपंचतन जि.प. मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराला ठाकरे गटाचा पाठिंबा आहे. त्यामुळे शेकापचा उमेदवार विजयी होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे. आराठी जि.प. मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध शिंदे गटात जोरदार लढत होणार आहे. दिघी गटात राष्ट्रवादी तसेच बोर्लीपंचतन व बागमांडला गणात ठाकरे गटाचे वर्चस्व दिसून येत आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# क्रिकेटला लाज आणली

नरेंद्र मोदींच्या भाजपने देशात तर राजकारणाचा चिखल केला आहेच. पण आता तीच घाण त्यांनी खेळांमध्येही पसरवली आहे. टी-ट्वेंटी स्पर्धेतून बांगलादेश बाहेर होणे हा त्या घाणीचाच परिणाम आहे. भाजपचे द्वेषाने आंधळे झालेले भक्त आणि त्यांच्या नादाला लागलेले पत्रकार सध्या आयसीसीने बांगलादेशाला धडा शिकवला असे म्हणून टाळ्या पिटत आहेत. पण हा केवळ महामूर्खपणा आहे. कोणत्याही खेळांचे सामने हे जनतेचे मन रिझवण्यासाठी खेळले जातात. दोन देशांमधले सामने म्हणजे युध्द नसते. मैदानावर असेपर्यंत खेळाडूंनी इर्षेने खेळावे आणि मैदानाच्या बाहेर आल्यावर ती शिल्लक राहू नये अशी अपेक्षा असते. खेळांमधून खिलाडूपणा, दिलदारपणा वाढीस लागावा ही अपेक्षा असते. इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यातील क्रिकेट सामने प्रचंड खुन्नसने खेळले जातात. पण म्हणून मैदानाच्या बाहेर दोन देशांच्या संघांमध्ये आणि दोन देशांमध्ये शत्रुत्व नसते. फुटबॉलमध्ये ब्राझील, अर्जेंटिना, मेक्सिको किंवा युरोपातील फ्रान्स, इटली, स्पेन, जर्मनी हे एकमेकांचे कडवे प्रतिस्पर्धी आहेत. पण म्हणून मैदानावरची स्पर्धा बाहेर शिल्लक राहत नाही. याउलट भारतीय उपखंडामध्ये मात्र आजकाल खेळांच्या सामन्यांकडे युध्द म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील खुन्नस जुनी आहे. मध्यंतरी अनेक वर्षे त्यांच्यात आपसात सामने बंद होते व सध्याही आहेत. पण तरीही खेळांमध्ये कधीही राजकारण आणले जात नव्हते. पण गेल्या वर्षी आशिया कप स्पर्धेच्या वेळी दुबईत भारतीय संघाने याची सुरुवात केली. पहलगाम हल्ल्याचे निमित्त करून भारतीयांनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्याचे नाकारले. हा खेळाच्या भावनेशी केलेला द्रोह होता. पहलगामला भारताने जे काय द्यायचे ते उत्तर दिले होते. ती लढाई खेळाच्या मैदानात नेण्याचे कारण नव्हते. नंतर पाकिस्तानी मंत्र्यांच्या हातून चषक स्वीकारायला आपण नकार दिला. त्याचीही काही गरज नव्हती. ते मंत्री तेथे आशियाई संघटनेचे पदाधिकारी म्हणून आले होते. पाकिस्तानी म्हणून नव्हे. भारतीय खेळाडूंनी अर्थातच हे स्वतःच्या अकलेने केले नव्हते. त्यांना मोदी सरकारकडून तशा सूचना मिळाल्या असाव्यात असे मानायला भरपूर जागा आहे.

## मुस्तफिजूरला का काढले

हा एक पोरकट पण तितकाच घातक असा विद्वेष होता. तो तिथेच थांबणे शक्य नव्हते. त्याच वेळी बांगलादेशाने उद्या भारताबाबत असे केले तर काय करणार असा सवाल आम्ही याच स्तंभात कृषीवलच्या संपादकीयातून केला होता. ते आता खरे ठरले आहे. बांगलादेशाच्या ताज्या भूमिकेमागेही भारताने सुरु केलेले राजकारण आहे. मुस्तफिजूर रहमान हा बांगलादेशाचा क्रिकेटपटू कोलकाता नाईट रायडर्ससाठी खेळतो. त्याला इथे खेळवू नये असा आदेश बीसीसीआयने काढला. त्यासाठी सध्याची परिस्थिती इतकेच मोघम कारण देण्यात आले. वास्तविक सध्याची ही जी काय परिस्थिती आहे ती बांगलादेशात आहे. तिथे गेल्या दीड वर्षापासून राजकारण अशांत आहे. जमाते इस्लामीच्या धर्मांध लोकांचे फावले आहे. त्यातून हिंदूंवर हल्ले होत आहेत. पण हे खरे असले तरी त्या देशात अजूनही कोट्यवधी हिंदू आपापले नोकऱ्या-धंदे करीत आहेत, अतिशय उच्च पदांवर सरकार वा न्यायालयांमध्ये काम करीत आहेत. हिंदूंच्या सरसकट सामूहिक कत्तली होत आहेत अशी वगैरे परिस्थिती नाही. यासाठी बांगलादेशाच्या हंगामी सरकारवर दबाव आणण्याकरिता भारत सरकार सक्षम आहे. बांगलादेशचे सरकार आता कितीही बेटकुळ्या दाखवत असले तरी ते अनेक बाबतीत भारतावर अवलंबून आहे. पाकिस्तानशी त्यांची नव्याने दोस्ती होत असली तरी त्याच पाकिस्तानशी लढून त्यांनी स्वातंत्र्य मिळवले होते हे सामान्य लोकांना विसरता येणे कठीण आहे. खुद्द पाकिस्तानात लष्करशाहीमुळे लोक परेशान आहेत आणि महागाईने त्यांचे कंबरडे मोडलेले आहे. या स्थितीत भारताने अधिक मुत्सदेगिरी दाखवून बांगलादेशाला आपल्याकडे वळवणे आवश्यक होते व अजूनही आहे. पण आपले सरकार व नोकरशाहीला इतका काही हिंदुत्वाचा ज्वर चढला आहे की, बांगलादेशाला पाकिस्तानच्या बरोबरीचा शत्रू मानू लागले आहेत. याच द्वेषातून मुस्तफिजूरला परत पाठवण्याचा आदेश काढण्यात आला. साहजिकच याची प्रतिक्रिया उमटणार होती व ती उमटली.

## बांगलादेशाची रास्त भूमिका

मुस्तफिजूरला खेळवणे तुम्हाला कठीण वाटत असेल तर आमच्या खेळाडूंना भारतात खेळणे सुरक्षित वाटत नाही अशी भूमिका बांगलादेश क्रिकेट बोर्डाने घेतली. ती त्यांच्या दृष्टीने रास्तच म्हणावी लागेल. उद्या समजा जसप्रित बुमराला इंग्लंड किंवा ऑस्ट्रेलियाने त्यांच्या देशात खेळण्यास काहीही कारण न देता प्रतिबंध केला तर भारतीय संघ हे ऐकून घेईल का? तेच बांगलादेशाने केले. अशा वेळी खरे तर एक आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून आयसीसीने त्रयस्थपणे यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करायला हवा होता. पण आयसीसीचे सध्याचे अध्यक्ष आहेत जय शाह. अमित शाह यांचे चिरंजीव. आणि आयसीसीच्या क्रिकेट कौन्सिलचे सीईओ आहेत संजोग गुप्ता. हे गुप्ता अलिकडपर्यंत जिओस्टारमध्ये म्हणजे अंबांनीच्या कंपनीत होते. त्यामुळे ते जय शाह यांच्या मताबाहेर जाणे शक्य नाही. आणि जय शाह हे अमित शाह आणि मोदींच्या हुकुमांची तामिली करण्यासाठीच तिथे गेलेले आहेत हे उघड आहे. आज खऱ्या अर्थाने सातत्याने क्रिकेट खेळणारे केवळ पाच-सहाच देश शिल्लक राहिलेले आहेत. वेस्ट इंडिज, पाकिस्तान इत्यादींची हालत खराब आहे. बाकीचे देश लिंबूटिंबू आहेत. क्रिकेट पाहणारी सर्वाधिक जनता भारतात आहे. आयसीसीला मिळणारे हजारो कोटी रुपयांचे उत्पन्न भारतातूनच येते. त्या जोरावर गेल्या काही वर्षांपासून भारताने क्रिकेटमध्ये हुकुमशाही सुरु केली आहे. इतर देश सध्या नाइलाजाने ती मान्य करतात. पाच-दहा देशांचे सामने, ज्याला आपण विश्वचषक वगैरे म्हणतो, ते सुरळीत पार पाडणे ही खरी तर आयसीसीची जबाबदारी आहे. मुळात भारतीय खेळाडूंनी हस्तांदोलनास नकार दिला तेव्हा किंवा नंतर मुस्तफिजूरला काढून टाकले तेव्हा आयसीसीने हस्तक्षेप करायला हवा होता. पण जय शाह यांना तेच हवे होते. आता यामुळे बांगलादेश बाहेर गेला आहेच. पाकिस्तान काय करील सांगता येत नाही. विशेष म्हणजे आशिया चषकाच्या वेळी आपण पाकिस्तानात सामने खेळणार नाही असा हट्ट भारताने धरला व त्यांचे सर्व सामने दुबईत झाले. त्याच धर्तीवर आमचे सामने श्रीलंकेत ठेवा असे बांगलादेशाचे म्हणणे होते. विश्वचषकाचा एक यजमान श्रीलंका हादेखील आहेच. त्यामुळे बांगलादेशाच्या म्हणण्यात गैर काही नव्हते. पण जय शाह यांनी आपल्या सत्तेच्या जोरावर बांगलादेशाला धडा शिकवला असे खोटे समाधान मिळवले. वास्तविक ते ज्या पदावर आहेत त्याने मुत्सदेगिरीने असे प्रश्न हाताळायला हवेत. पण त्यांना हिंदू विरुध्द मुस्लिम या द्वेषापलिकडे काही दिसतच नसेल तर काय करणार? भारताला आणि क्रिकेटला लाज आणणारा हा प्रकार आहे.

विचार

# अधिकाऱ्यांमधले उंदीर शोधण्याचे आव्हान

***देशभरात सातत्याने धान्य खरेदी, साठवणुकीतील घोटाळ्याच्या बातम्या येत असतात. अधिकाऱ्यांनी घोटाळा करायचा आणि प्राण्यांवर दोषारोप करायचा, असे सतत घडत आहे. छत्तीसगड जिल्ह्यात २६ हजार क्विंटल धान उंदरांनी फस्त केल्याचा कांगावा अलिकडेच अधिकाऱ्यांनी केला; परंतु खरेदी आवक-जावकच्या बनावट पावत्या तसेच अन्य बनावट कागदपत्रांमुळे पितळ उघडे पडले. हा खोटेपणा कधी थांबणार?***



राही भिडे

छत्तीसगडमधील कवर्धा जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तिथे सुमारे सात कोटी रुपये किमतीचे २६ हजार क्विंटल धान गायब करण्यात आले. त्याला पायच फुटले म्हणा ना! या घटनेने जनता हैराण झाली असली, तरी जिल्ह्याच्या पणन विभागातील अधिकारी या नुकसानीसाठी उंदीर, वाळवी आणि कीटकांना जबाबदार धरत आहेत. २०२४-२५ मध्ये धान खरेदी करण्यात आले होते. हे संपूर्ण प्रकरण २०२४-२५ चे आहे. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांकडून आधारभूत किमतीवर धान खरेदी केले होते. जिल्ह्यातील दोन प्रमुख साठवणूक केंद्रांवर हे धान साठवण्यात आले होते. दोन्ही केंद्रांवर एकूण सात लाख ९९ हजार क्विंटल धान साठवण्यात आले होते. धान उचलल्यानंतर साठा जुळवला असता, या दोन्ही साठवणूक केंद्रांवर २६ हजार क्विंटल धानाचा तुटवडा आढळून आला. सर्वात मोठी तफावत बाजार चारभाठा साठवणूक केंद्रात आढळून आली. तिथे २२ हजार क्विंटल धान गहाळ असल्याचे आढळून आले. याची किंमत अंदाजे ७ कोटी रुपये होती. या प्रकरणाबाबत बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारीविरुद्ध उच्चस्तरीय तक्रार दाखल करण्यात आली. खरेदी केंद्र अधिकाऱ्यांशी संगनमत करून प्रभारींनी धानाची खोटी आवक-जावक दाखवली. प्राथमिक चौकशीत तक्रारी खऱ्या असल्याचे आढळून आले आणि त्यांना काढून टाकण्यात आले. विभागीय आदेशांनुसार धानाची दोन टक्के कमतरता आढळली, तर संबंधित व्यक्तीला निलंबित करणे, चौकशी करणे आणि नंतर एफआयआर दाखल करणे आवश्यक आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो, की जर उंदीर आणि वाळवी यांनी धान खाल्ले असेल, तर बनावट बिले कोणी तयार केली? बनावट नोंदी कोणी केल्या? सीसीटीव्हीमध्ये छेडछाड कोणी केली? आणि जर सर्व काही ठीक असेल तर कर्मचाऱ्याला का काढून टाकण्यात आले?

वस्तुत: येथे कामगारांची बनावट उपस्थिती नोंदवण्यात आली. संकलन केंद्रात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये वारंवार छेडछाड करण्यात आली. या पद्धतशीर फसवणुकीमुळे सुमारे सात कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाला. अधिकाऱ्यांच्या विधानात मोठी तफावत आहे. जिल्हा मार्केटिंग अधिकारी (डीएमओ) अभिषेक मिश्रा यांनी सांगितले, की संकलन केंद्राचे प्रभारी प्रीतेश पांडे यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्यात आले. हवामान परिस्थिती आणि उंदीर, वाळवी आणि कीटकांमुळे झालेल्या नुकसानामुळे धान कमी भरल्याचे त्यांनी सांगितले. कवर्धा जिल्ह्यातील परिस्थिती राज्यातील इतर ६५ संकलन केंद्रांपेक्षा चांगली असल्याचा दावाही त्यांनी केला. या केंद्राची ही अवस्था असेल, तर इतर केंद्रांची काय अवस्था असेल, याचा विचार न केलेलाच बरा! दरम्यान, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या सहाय्यक जिल्हा अन्न अधिकाऱ्यांनी सांगितले, की तक्रार गंभीर आहे आणि प्राथमिक तपासात आरोप खरे असल्याचे आढळून आले आहे. बाजार चारभाठा संकलन केंद्राच्या प्रभारींविरुद्ध विविध बाबींवर तक्रार प्राप्त झाली आहे. चौकशीसाठी एक पथक स्थापन करण्यात आले आहे आणि अंतिम अहवाल आल्यानंतर कठोर कारवाई केली जाईल. या प्रकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. कोट्यवधी रुपयांचे धान गायब होणे आणि उंदीर आणि वाळवी यांच्यावर दोषारोप केल्याने प्रशासकीय यंत्रणा आणि देखरेख यंत्रणेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. चौकशीनंतर या प्रकरणात कोणाला शिक्षा होणार आणि शेतकऱ्यांचे हित कसे भरून काढले जाईल हे पाहणे बाकी आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एक उंदीर दररोज १५ ते वीस ग्रॅम धान खातो. अन्य काहीही खायला मिळाले नाही, तरी तो जगतो. धान वर्षभर तिथे होते. २६ हजार क्विंटल धान्य फस्त करण्यासाठी त्या गोदामात दररोज साडेतीन लाख उंदीर यायला हवेत. तेवढी त्या गोदामाची क्षमता आहे का, हा खरा प्रश्न आहे. गैरप्रकार माणसाने करायचे आणि त्याचे खापर प्राण्यांवर फोडायचे ही विकृती आजची नाही. तसे करताना संबंधित अधिकाऱ्यांनी तर्कसंगत मांडणी करायची तर ते ही नाही. हास्यास्पद दावे करून आपल्या गळ्यातील जोखड दुसऱ्याच्या गळ्यात फेकून मोकळे व्हायचे, ही वृत्ती असते; परंतु कधी तरी पितळ उघडे पडतेच. २०२२ मध्ये वैशाली जिल्ह्यातील गंडक कालव्यावरील एका धरणाचे नुकसान झाले होते. त्या वेळी असे म्हटले जात होते, की उंदीर धरण कुरतडत होते. त्यामुळे ते गळती लागून फुटले आणि गावात पाणी शिरले. जून २०२४ मध्ये सिवानमधील नवादा गावातही अशीच एक घटना घडली. उंदरांवर दोषारोप ठेवण्यात आला. जास्त पाण्याच्या भारामुळे धरण कमकुवत होऊन फुटले आणि नवादा गावात पाणी शिरले. धरण फुटल्याची जबाबदारी असलेले कनिष्ठ अभियंता मदन मोहन यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, की कालव्याच्या बाहेर जाण्यासाठी जागा सोडण्यात आली. उंदरांनी त्यात सर्वत्र छिद्रे पाडली होती. पाणी भरल्यामुळे गळती वाढली आणि अशा प्रकारे धरण फुटले. महाराष्ट्रातही तत्कालीन जलसंपदा मंत्री तानाजी सावंत यांनी चिवरे धरण खेकड्यांनी उकरल्यामुळे फुटल्याचा अजब दावा केला होता. काही दिवसांपूर्वी मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गाला भगदाड पडण्याचे खापरही उंदरावर फोडण्यात आले होते. अधिकारी उंदरांवर कशाचा दोषारोप करतील याचा भरवसा नसतो. २०१६-१७ मध्ये कैमूर आणि पाटणा येथे दारूबंदीच्या काळात जप्त केलेल्या दारूचा साठा नंतर कमी आढळला. तेव्हा उंदरांवर दारू पिण्याचा आरोप करण्यात आला. विशेष म्हणजे असा आरोप पोलिसांनीच पत्रकार परिषदेत केला. मार्च २०१९ मध्ये पाटण्यातील बोरिंग रोडवरील एका दागिन्यांच्या दुकानातून उंदरांनी हिऱ्यांचे दागिने चोरले. अशा घटना रोखण्यासाठी सरकारने प्रथम यंत्रणेत घुसलेल्या 'उंदरां'चा बंदोबस्त केला पाहिजे. एका रुग्णालयात सलाईनचा साठा कमी आढळला, तर तिथेही उंदरांनी सलाईन प्यायल्याचा दावा केला. मध्य प्रदेशमधील जबलपूर येथे झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या धान्य घोटाळ्यात झालेले सरकारी तिजोरीचे नुकसान भरून काढण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला. जबलपूर जिल्हाधिकाऱ्यांनी १२ कर्मचाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश जारी केले. जबलपूरमध्ये झालेल्या धान खरेदी घोटाळ्यात या व्यक्तींचा सहभाग असल्याचा आरोप आहे. त्यामुळे सरकारचे अंदाजे ४३ कोटी रुपयांचे नुकसान झाले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून १६ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. धान्य वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये स्कूटर, कारचे क्रमांक देण्यात आले. या घोटाळ्यात सरकारची फसवणूक करण्याव्यतिरिक्त अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली आणि त्यांना त्यांचे पैसे देण्यास नकार देण्यात आला. 'एसआयटी'च्या तपासात याचे पुरावे सापडले आहेत. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते. तत्कालीन एसडीएम, एडीएम आणि लेखापाल यांनाही कारवाईला सामोरे जावे लागू शकते. आता हरयाणातही असाच पाच हजार कोटी रुपयांचा धान्य घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे. तिथल्या शेतकरी संघटनांनी त्याविरोधात आंदोलन सुरू केले आहे. म्हणजेच एकुणात, उंदरांवर किंवा अन्य प्राण्यांवर दोषारोपण करुन मनुष्यप्राणी काळे धंदे करत आहे. अशा गैरव्यवहारांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे, शिवाय ते ठराविक प्रांत किंवा राज्यापुरते मर्यादीत नाही. म्हणजेच गैरव्यवहाराची ही क्लृप्ती सर्वदूर पसरली आहे. आणि त्याच्या मुळाशी आहे ती पैशांची हाव आणि या प्रकारे अनियमितता झाली तरी ती तपास अधिकाऱ्यांच्या लक्षात येणार नाही, हा विश्वास. याखेरीज, गैरप्रकार उघडकीस आला तरी आपल्याला वाचवणारे कोणी तरी आहे, याचीही खात्री चोर अधिकाऱ्यांना आहे. असा प्रकार सार्वत्रिक होत असल्यामुळे सरकारने थोडे जागे होऊन परिस्थितीवर नियंत्रण ठेवायला हवे.

# मुंबईत मराठी माणसाचीच कसोटी




वैष्णवी वाडकर

सध्या देशभरात बेरोजगारीच प्रमाण प्रचंड वाढलेआहे. हल्ली नवख्यांना पण नोकरी हवी असेल, तर किमान एक वर्षांचा अनुभव मागितला जातो. परंतु, नुकतेच पदवी किंवा पदवीयुत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणांकडे एक वर्षाचा अनुभव असणे शक्य नसते. त्यामुळे नोकरी शोधताना आजच्या तरुणाची तारांबळ उडत आहे. देशात वाढत असलेल्या बेरोजगारीमुळे अनेक तरुण आत्महत्या करून आयुष्य संपवत आहेत; तर, काही तरुणांनी व्यवसाय करण्याचा मार्ग निवडला आहे. मात्र, आज व्यवसाय करायचा म्हंटल तरी तरुणांना असंख्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच मुंबईत व्यवसाय करायचा म्हणजे एक वेगळीच कसोटी ठरत आहे. मुंबईतील डोंबिवली येथे व्यवसाय करणाऱ्या एका मराठी तरुणीची सध्या सर्वत्र चर्चा सुरु आहे. गेल्या ३ ते ४ महिन्यांपासून या तरुणीला डोंबिवलीत टपरी चालवण्यासाठी अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. मात्र, त्याच जागेत परप्रांतीय सुरळीतपणे आपला व्यवसाय करताना दिसत आहेत. त्यामुळे मुंबईत मराठी माणसाला व्यवसाय करणे कठीण झाल्याचे सर्वत्र बोलले जात आहे. आता या घटनेमुळे पुन्हा एकदा मराठी माणूस आणि परप्रांतीय हे चर्चेचे विषय ठरत आहेत. सध्या मुंबईत बहुतांश व्यवसाय हे परप्रांतियांकडून थाटलेले दिसत असून मुंबईत मराठी माणलासाचीच कसोटी लागत असल्याने संपूर्ण मराठी जनातून नाराजीचे सुर उमटत आहेत.

कल्याण पूर्व येथील मराठी तरुणी एकता सावंत हिची डोंबिवली रेल्वे स्टेशन परिसरात खाद्यपदार्थाची टपरी आहे. एकता उच्च शिक्षित असून या आधी ती एका बँकेत नोकरी करत होती. मात्र, कामाचा ताण सहन होत नसल्याने तिने खाद्यपदार्थाची टपरी चालू केली. ती या टपरीवर शॉरमा विकण्याचा व्यवसाय करते. तिला वडील नसल्यामुळे घरात ती एकटीच कमावत असून तीला आई व दोन भावंडांचे पोट भरावे लागते. अनेक युटूबर्सकडून या तरुणीच्या शॉरमाच्या कौतुकीचे व्हिडिओ युटूबवर प्रसिद्ध केल्या आहेत. त्यामुळे एक मराठी मुलीने उत्तम रित्या व्यवसाय अतिशय करते म्हणून अनेकांनी तिचे कौतुक केले. मात्र, हा व्यवसाय करत असताना या तरुणीला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महापालिकेच्या फेरीवाला हटाव पथकाने या तरुणीची शॉरमाची टपरी हटवली आहे. ही कारवाई फक्त या मराठी तरूणीच्या टपरीवर केली जात असून इतर हातगाडी आणि फेरीवाल्यांना केडीएमसीचे अधिकारी पाठीशी घालत असल्याचा दावा देखील तिने केला आहे.

या संदर्भात या तरुणीने समाजमाध्यमावर व्हिडिओ पोस्ट करत आपली व्यथा जनतेसमोर मांडली. तिने सांगितले की, तिच्याकडून रोज ३०० रुपये हप्ता घेतला जात होता. तरी देखील ही कारवाई करण्यात आली आहे. त्यानंतर सर्व न्युज चॅनेल व सोशल मीडियावर या प्रकरणाची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली. अनेक मराठी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच तरुणांनी एकता सावंत हिच्या समर्थनार्थ आवाज उठवला. मराठी तरुणी स्वतःच्या पायावर उभी राहण्याचा प्रयत्न करत असताना तिला अडथळे आणले जात आहेत; तर, त्याच परिसरात परप्रांतीय फेरीवाले बिनधास्तपणे व्यवसाय करत आहेत, असा संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, महापालिकेच्या फेरीवाला हटाव पथकाकडून ही कारवाई नियमांनुसार केल्याचे या तरुणीला सांगण्यात आले. मात्र, नियम सर्वांसाठी समान असतील तर कारवाईही सर्वांवर समान झाली पाहिजे, असा सवालही या तरुणीने उपस्थित केला आहे. एका मराठी तरुणीने प्रामाणिकपणे कष्ट करून व्यवसाय उभारण्याचा प्रयत्न केला असताना तिला वारंवार हटवले जात असल्याने, मुंबईत मराठी माणूस व्यवसाय करू शकत नाही का, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

देशातील वाढती बेरोजगारी पाहता अनेक तरुण आज नोकरीऐवजी व्यवसायाचा मार्ग निवडत आहेत. अशावेळी प्रशासनाने त्यांना अडवण्याऐवजी योग्य मार्गदर्शन, परवाने आणि संरक्षण देणे गरजेचे आहे. एकता सावंतसारख्या तरुणींनी दाखवलेली जिद्द आणि मेहनत ही समाजासाठी प्रेरणादायी आहे. मात्र, जर अशा प्रयत्नांना वारंवार अडथळे आणले गेले तर तरुणाईचा आत्मविश्वास ढासळण्याची भीती व्यक्त होत आहे. डोंबिवलीतील ही घटना केवळ एका तरुणीच्या टपरीपुरती मर्यादित नसून ती मुंबईतील मराठी तरुणांच्या अस्तित्वाची, हक्कांची आणि समानतेची लढाई दर्शवते. रोजगाराच्या संधी कमी होत असताना स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणाऱ्या तरुणांना प्रशासन आणि समाजाने पाठबळ देणे ही काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यात मुंबईत मराठी माणसांना पावलोपावली कसोटीचा सामना करावा लागेल, आणि त्यात परप्रांतियांना भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून जिंकवले जाईल, अशी संतप्त प्रतिक्रीया मराठी जनमाणसांत उतटत आहे.

लोकसंसद

## तमाशा कलेचा सन्मान !

तमाशा कला जिवंत ठेवण्यासाठी चार दशकांहून अधिक काळ झगडणारा अस्सल लोक कलावंत, महाराष्ट्राचा लोककलेचा आवाज असलेले जेष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना यावर्षीचा मानाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला हे वाचून तमाशा कलेवर प्रेम करणाऱ्या गाव खेड्यातील प्रेक्षकांना खूप आनंद झाला आहे. रघुवीर खेडकर यांनी जवळपास चार दशके तमाशा जिवंत ठेवण्यासाठी रात्रीचा दिवस केला. तमाशा हे केवळ मनोरंजनाचे नाही तर ते समाजप्रबोधनाचेही माध्यम आहे हे ओळखून त्यांनी मनोरंजनाबरोबरच तमाशातून व्यवसनमुक्ती, स्वच्छता, गुन्हेगारीवृत्ती, कौटुंबिक कलह, महापुरुषांची गैरवगाथा असे विविध विषय वगनाट्याचा माध्यमातून हाताळून आपली सामाजिक भावना जपली. त्यांनी ५० हून अधिक वगनाट्याचे विषय घेऊन ९ हजारांहून अधिक प्रयोग सादर केले. राज्यात सर्वप्रथम केवळ महिलांसाठी तमाशाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे श्रेयही त्यांना जाते. रघुवीर खेडकर यांनी तमाशाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनच केले असे नाही तर त्यांनी आपली सामाजिक बांधिलकीही जपली. त्यांनी अनेक शाळा, संस्था, रुग्णालये, वाचनालये, मंदिराची उभारणी यासाठी ४५० हून अधिक विनामोबदला कार्यक्रम करून दीड कोटीहून अधिक रुपयांची रक्कम देणगी म्हणून दिली. रघुवर खेडकर यांना पद्मश्री देऊन सरकारने संपूर्ण तमाशा कलेचा सन्मान केला असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. पद्मश्री मिळाल्याबद्दल ज्येष्ठ लोक कलावंत रघुवीर खेडकर यांचे मनापासून अभिनंदन!

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# क्रांतिकारक लाला लजपत राय

लाला लजपत राय म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर क्रांतिकारक नेते. त्यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ रोजी पंजाबच्या लुधियाना जिल्ह्यात धुंढिके (जागराँ तहसील) या गावी जैन घराण्यात झाला. त्यांची आई (गुलाबदेवी) मूळची शीख होती. वडील लाला राधाकिशन हे फार्सी व उर्दू विषयांचे शिक्षक आणि मनाने इस्लामचे अनुयायी होते. धार्मिक सहिष्णुतेच्या वातावरणात वाढत असलेल्या लजपत रायांनी मिशन हायस्कूलमधून शिक्षण घेऊन पुढे एल. एल. बी. ही पदवी मिळविली (१८८६) आणि अल्पकाळातच यशस्वी वकील म्हणून त्यांना मान्यता मिळाली. पुढे १८९२ साली लाहोरला स्थायिक होऊन त्यांनी तेथे वकिली सुरू केली. तत्पूर्वी विद्यार्थीदशेतच त्यांचे राधादेवी या हिस्सार येथील अगरवाल कुटुंबातील मुलीशी लग्न झाले (१८७७). त्यांना दोन मुलगे व पार्वती नावाची मुलगी होती. त्याकाळी जातीच्या भिंती तोडून समर्थ होऊन परकीय इंग्रज सरकारविरुद्ध आवाज उठविणाऱ्या आर्य समाजाची पंजाबी हिंदूंवर मोहिनी पडू लागली होती. लालाजींनाही त्याचे आकर्षण वाटले आणि ते सक्रिय आर्य समाजवादी झाले. अर्जविनंत्यांचे नेमस्त राजकारण चालविणाऱ्या काँग्रेसबद्दल त्यांना सहानुभूती वाटेना.

आपल्या मागण्यांसाठी त्यांनी हिरिरीने प्रचार केला; तथापि १९०४ मध्ये पंजाबी नावाचे पुढे विख्यात झालेले पत्र सुरू करून पंजाबचे प्रतिनिधी म्हणून ते काँग्रेस अधिवेशनास गेले. तेथे त्यांचा एवढा प्रभाव पडला, की ब्रिटिशांसमोर हिंदी जनतेची कर्झनशाहीतील दुःखे व किमान राजकीय मागण्या मांडण्यासाठी सुरेंद्रनाथ बॅनर्जी, मुहंमद अली जिना आणि गो. कृ. गोखले यांच्याबरोबर लालाजींचीही निवड झाली. मे १९०५ मध्ये ते इंग्लंडला गेले; परंतु तेथील लोक स्थानिक प्रश्नांत एवढे मग्न होते की लालाजींच्या दौऱ्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट परतल्यावर बंगालची फाळणी जाहीर झाली.

लालाजींना पंजाबचा सिंह म्हणून गौरविण्यात येऊ लागले. त्यांच्या कारावासाच्या काळात त्यांच्या अनेक अनुयायांनी सौम्य धोरण अवलंबून लोटांगणवादी भूमिका घेतली. त्याची दुःखद जाणीव त्यांना सुटकेनंतर झाली. काही शिखांनी तर अजितसिंग हे शीख नव्हतेच, असे पत्रक काढले. आर्यसमाजी नेत्यांनी आपले राजकारणाशी काहीही कर्तव्य नाही असे वारंवार घोषित केले. त्यामुळे महिन्याभराने भरलेल्या सुरत काँग्रेसचे अध्यक्ष व्हा, असा प्रस्ताव पंजाबबाहेरील जहाल नेत्यांनी मांडला. त्याला लालाजींनी संमती दिली नाही. हद्दपारीच्या काळात गोखल्यांनी सतत त्यांची बाजू मांडली असल्यामुळे आपले जहाल समर्थक आणि मवाळ गट यांच्यात तडजोड करण्याची त्यांनी शिकस्त केली. त्यामुळे मनाने व वृत्तीने जहाल पण शरीराने मवाळ गटात अशी सुरतला काँग्रेस दुभंगल्यावर लालाजींची अवस्था झाली.

१९२५ च्या पहिल्या अधिवेशनाचे लालाजी अध्यक्ष होते. १९२६ नंतर स्वराज्य पक्षाने असेंब्लीवर बहिष्कार घातला. त्यात लालाजी सामील झाले नाहीत. मात्र पुढे जयकर, केळकर प्रभृती राष्ट्रीय पक्षातर्फे पुन्हा निवडून आले. १९२८ च्या फेब्रुवारीमध्ये केंद्रीय असेंब्लीत सायमन कमिशनवर सर्व ब्रिटिश सदस्य नेमल्याबद्दल सरकारचा निषेध करणारा ठराव लजपत रायांनी मांडला होता. तो बहुमताने संमत झाला. नोव्हेंबरच्या सुरुवातीस पंजाबमध्ये कमिशन आल्यावर लालाजींनीच निदर्शनाचे नेतृत्व केले. त्यातील जबर मारहाणीने ते आजारी पडले आणि त्यातच १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ जानेवारी

१)श्री.दत्ताराम बाळाराम राऊत मापगाव २८-१-१९६०


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व.शुभांगी सुरेश पाटील, पाचवे पुण्यस्मरण, हेमनगर कुसुंबळे, ता.अलिबाग**

**ॲड. श्री. राजेंद्र जैन, वाढदिवस अलिबाग**

**स्व. वामन दामोदर पाटील, स्मरणार्थ, विद्यानगर, अलिबाग**


### महादेव लहाने यांचे निधन

**। खांब । प्रतिनिधी।**


पुई गावचे रहिवासी महादेव धोंडू लहाने गुरूजी यांचे दि.२० जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. महादेव लहाने हे पुईचे गुरूजी म्हणून सर्वपरिचित होते. त्यांनी शिक्षकी सेवेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातू, दोन मुली असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी दि.३१ जानेवारी रोजी तर अंतिम धार्मिक विधी दि.३ फेब्रुवारी रोजी होणार आहेत.

# लाखोंचे वीजबिल थकीत

## • श्रीवर्धनमधील रस्ते अंधारमय होण्याची शक्यता

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन नगरपरिषदेने महावितरणचे जवळजवळ २५ लाख रुपयांचे बिल थकवल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये रानवली येथील जलशुद्धीकरण प्रकल्प त्याचप्रमाणे पाणीपुरवठा विभाग असे मिळून ९ लाख २७ हजार रुपयांची थकबाकी आहे. तर पथदिव्यांची थकबाजी ९ लाख ३८ हजार ८९० रुपये आहे. त्याचप्रमाणे नगरपरिषद कार्यालयाव्यतिरिक्त असणारे अनेक बगीचे, स्वच्छतागृह या ठिकाणचे मिळून एकूण ४६ वीज कनेक्शनचे तब्बल २५ लाख रुपये थकबाकी असल्याची विश्वसनीय



माहिती समोर आली आहे.

त्यातच महत्वाची गोष्ट म्हणजे चार महिन्यांपूर्वी सी. एस. आर. फंडामधून सौरऊर्जेचे दिवे श्रीवर्धन शहरांमध्ये समुद्रकिनाऱ्यापर्यंतच्या मार्गावर बसविण्यात आले.

मात्र प्रत्यक्षात या सौरदिव्याच्या दिव्यांना सौरऊर्जा पुरवणारे संच अद्याप पूर्णपणे कार्यान्वित केलेले नाहीत. सध्या हे सौरऊर्जेवरील दिवे महावितरणच्या विजेवरच चालू आहेत. त्यामुळे श्रीवर्धन नगरपरिषदेवर वीज बिल भरण्याचा अतिरिक्त ताण येत असल्याचे बोलले जात आहे. श्रीवर्धन नगरपरिषद शहरातील नागरिकांकडून नेहमी विविध माध्यमांतून कर जमा करत असते. या करापोटी खूप मोठ्या प्रमाणात रक्कम जमा केली जाते. परंतु, वीज बिल कसे काय थकले? याबाबत नगर परिषदेकडून अद्याप कोणताही खुलासा करण्यात येत नाही.

दिवसेंदिवस श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटकांची संख्या वाढत आहे. पर्यटक या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात येत आहेत. पर्यटक श्रीवर्धन शहरांमध्ये प्रवेश करताना देखील कर देत असतात. मात्र नगरपरिषदेकडून जर का जनतेला अशा प्रकारे असुविधा देण्याचा प्रकार घडत असेल तर ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे.

> “श्रीवर्धन नगर परिषदेचे थकीत बिल हे पूर्णपणे पथदिव्यांचे नसून अन्य देखील बिल काही प्रमाणामध्ये बाकी असल्याबाबत आपण लवकरच माहिती घेऊ. तसेच, वीज बिल का भरले नाही, याबाबत देखील चौकशी करू. काही तांत्रिक अडचण असल्यास वीज बिलाचा भरणा लवकरच करण्यात येईल.”
>
> – विठ्ठल राठोड, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन

## श्रणवची कला क्षेत्रात यशस्वी कामगिरी

**। महाड । प्रतिनिधी ।**

कला संचालनालयामार्फत महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन २९ डिसेंबर २०२५ ते ६ जानेवारी २०२६ आयोजित करण्यात आले होते. यामध्ये राज्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यादरम्यान सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टचा विद्यार्थी तथा भेलोशी गावचा गुणवंत कलाचित्रकार श्रणव संतोष यादव यांनी कला क्षेत्रात सहभागी होऊन भावूक (इमोशनल) वस्तूचित्र (इनसेट) अशा दोन विषयावरील चित्र रेखाटले होते.



त्यांचा नुकताच ऑनलाईन निकाल जाहीर झाला. यामध्ये श्रणव यादव यशस्वी झाला आहे. श्रवण यादवांनी दिलेल्या त्यांच्या सामाजिक विषयांच्या चित्रांना पंचांनी दाद देत त्यांच्या या यशस्वी कामगिरी बाबत दि.६ फेब्रुवारी रोजी सांगली येथील विश्वविद्यालय शाळेत पारितोषिक वितरण करण्यात आल्याचे ऑनलाईन निकालामध्ये सांगण्यात आले आहे. श्रणवच्या उत्तुंग यशाबद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयाला पुरस्कार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी जिल्हा निवडणूक अधिकारी वाघमारे, अश्विनी पाटील, प्रभारी प्रा. डॉ. आमोल ठक्कर, उपप्राचार्य डॉ. अनिल पालवे, डॉ. संदीप घोडके, चेअरमन निवडणूक साक्षरता मंडळ प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय सेवा योजना चेअरमन डॉ. राजकुमार कांबळे, एन.सी.सी चेअरमन प्रा. श्रीकांत गोतपागर प्रा.गजानन चव्हाण, उपप्राचार्य तसेच अन्य जण उपस्थित होते.

२५ जानेवारी २०२६ रोजी मतदार जागृती दिनाचे औचित्य साधून, फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला,



विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात महाविद्यालयाच्या पुढाकाराने मतदान नोंदणी करण्यात आल्याबद्दल जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, डी.एल.एल.ई. निवडणूक साक्षरता मंडळ, राज्यशास्त्र विभाग सर्व विद्यार्थी व सेवक यांच्या माध्यमातून महाविद्यालयात वर्षभर मतदान साक्षरता, मतदान जागृती तसेच विद्यार्थी व परिसरातील नागरिक नवमतदार नोंदणी ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने मोठ्या प्रमाणात करून घेतली. मतदार जागृतीसाठी निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन, मतदान जागृती रॅली परिसरातील नवघर, भेंडखळ, जसखार, करळ, सोनारी, सिडको कॉलनी इत्यादी ठिकाणी काढण्यात आली.

## माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**। तळा, । प्रतिनिधी ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या तळा इंग्लिश स्कूल तळा, इयत्ता १० वी अ आणि ब शैक्षणिक वर्ष १९९५-१९९६ मधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन श्री गो.म. वेदक विद्यामंदिर, तळा या ठिकाणी रविवारी (दि.२५) आयोजित करण्यात आले होते.

यावेळी सर्व माजी विद्यार्थी आपल्या तीस वर्षांपूर्वीच्या आठवणीमध्ये रमून गेले होते. यावेळी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, आरक्षणाचे जनक राजर्षी



शाहू महाराज आणि संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी प्रकाश गायकवाड यांनी केले. यामध्ये त्यांनी आपल्या तीस वर्षांपूर्वीच्या शाळेच्या जीवनातील आठवणींना उजाला दिला आणि कार्यक्रमामध्ये काही काव्यपंक्ती सादर करून चांगली रंगत आणली. यानंतर संस्थेचे विद्यमान पदाधिकारी व तत्कालीन गुरुजन वर्ग यांची ओळख उपस्थितांना करून देण्यात आली. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी देखील आपापली ओळख उपस्थित गुरुजन आणि मान्यवरांना करून दिली. माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सर्व संस्था पदाधिकारी, सर्व गुरुजन यांचा शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर संस्था पदाधिकारी आणि गुरुजनांनी माजी विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

## शिहू शाळेत विविध कार्यक्रम

**शिहू :** राजिप प्राथ. केंद्र शाळा शिहूसह ग्रामपंचायत कार्यालय शिहू येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. यानिमित्त विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाळा शिहूचे ध्वजावंदन मुख्याध्यापक जीवन ठाकूर यांच्या हस्ते, तर ग्रामपंचायत कार्यालय शिहूचे ध्वजावंदन भारतीय सैनिक नरेंद्र शेळके यांच्या हस्ते झाले. त्यानंतर राष्टभक्तीपर गीत, कवयात, नृत्यकला सादर करण्यात आली. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पान १ वरून

## चौलमधून महाविकास आघाडीचा शंखनाद

अनया अमित फुंडे, रेवदंडा-नागाव पंचायत समितीचे उमेदवार राकेश म्हात्रे, शेकाप रेवदंडा शेकापचे शहराध्यक्ष निलेश खोत, चौलचे माजी उपसरपंच काशिनाथ घरत, आर.डी. म्हात्रे, राजीव मोरे, अमित फुंडे, सुरेश खोत, राजेंद्र ठाकूर, विजय ठाकूर, विजय चौलकर, अजित गुरव, निलेश म्हात्रे, मारुती भगत, निलेश गाडे, अशोक नाईक तसेच काँग्रेसचे अशोक अंबुकर, आशिष गोंधळी यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना द्वारकानाथ नाईक यांनी आई शितळादेवीच्या आशीर्वादाने सुरू झालेला प्रचार निश्चितच आघाडीला विजय मिळवून देईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी एकजुटीने आणि एकदिलाने काम करून आघाडीच्या सर्व उमेदवारांना सर्वाधिक मतदान मिळवून देण्यासाठी सज्ज राहावे, असे आवाहन त्यांनी केले. चौल, नागाव आणि रेवदंडा परिसरातील आघाडीचा कार्यकर्ता एकनिष्ठ असून, सर्वाधिक मताधिक्य आपल्यालाच मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांनी आपल्या भाषणात विरोधी उमेदवारावर जोरदार टीका केली. स्वतःचे घर आणि बंगला तोडण्याची वेळ आली म्हणून शिंदे गटात प्रवेश केल्याची पोलखोल करत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. नागाव ऑफिसजवळील इमारत वाचवण्यासाठी पक्षप्रवेशाचा दस्तुरखुद्द आमदारांचाच दबाव होता, अशी कबुली विरोधी उमेदवाराने दिल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, आज सर्वसामान्यांच्या विकासासाठी आणि आग्रावच्या रस्त्यासाठी पक्षप्रवेश केल्याचा खोटा आव आणला जात आहे. कारण, रस्ता दोन वर्षांपूर्वी मंजूर झाला आणि यांनी पक्षप्रवेश आता काही महिन्यांपूर्वी केला. त्यामुळे विकासाच्या नावाखाली कोणाचा विकास सुरू आहे, यांना कोणाचा विकास करायचा आहे, हे जनतेने वेळीच ओळखण्याची गरज आहे. आग्रावचा रस्ता दोन वर्षांपूर्वीच मंजूर झाला होता, तरीही त्या रस्त्याच्या नावावर राजकारण केले जात असल्याचा आरोप सुरेंद्र म्हात्रे यांनी केला. सध्या सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. चौलमधील रस्ते आणि गल्ल्यांचे काँक्रिटीकरण ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आपल्या पुढाकारातूनच झाले असून, चौल बदलण्याचे काम महाविकास आघाडीनेच केले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. खोटा प्रचार करणारा हा भस्मासूर असून, त्याचा भस्म करायला वेळ लागणार नाही. मी तर त्याची वाट पाहतोय. सर्व कार्यकर्त्यांनीही सज्ज राहायचे आहे. आजपपासून खऱ्या अर्थाने प्रचाराल सुरुवात करायची आहे. खोटा प्रचार सहन केला जाणार नाही, कोणताही वाद न करता निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले. लोकांपर्यंत आपली निशाणी मशाल व खटारा पोहोचवून प्रभावी प्रचार करण्याचे आवाहन त्यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना दिले. आज नागावमध्ये सांगितले जातेय, चौल अख्खं ताब्यात घेतले आहे. आणि चौलमध्ये सांगितले जातेय, नागाव अख्खं आम्ही ताब्यात घेतले आहे. ताब्यात कुठलंच काही घेतले नाही. आज आपल्यासमोर जो उमेदवार आहे, त्याने नागाव काय आणि कसा उद्ध्वस्त केला आहे, ते पाहावे, आणि चौलमध्येही वाड्या उद्ध्वस्त करायला सुरुवात केली आहे. त्याने काही लोकांना जसे नागावमध्ये फसवले आहे, तसेच आज चौलमध्ये सुरुवात केली आहे. चौलमध्ये वाडी आणि घर असलेली वडिलोपार्जित जागा स्वतः विकत घेऊन स्थानिकाचा जाण्या-येण्याचा मार्ग बंद केला, आणि विचारायला गेल्यावर दादागिरी करीत विमानाने जा असे सांगत धमकावल्याचा आरोप सुरेंद्र म्हात्र यांनी विरोधी उमेदवारावर केला. चौलमध्ये असली दादागिरी खपवून घेणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. खोटी कामे, कोणावर अन्याय होत असेल, तर तो सहन केला जाणार नाही. नागावमध्ये छोट्या व्यावसायिकांचे व्यवसाय उद्ध्वस्त करुन जागा बळकावल्या, तसे उद्योग चौलमध्ये करु देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. आमदार, खासदार, मंत्री आमचे ओळखीचे आहेत, त्यांची भीती सर्वसामान्यांना दाखवून धमकावण्याचा कोणी प्रयत्न केला, तर जशास तसे उत्तर देण्यास मी समर्थ आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला. कोणत्याही दबावाला न झुगारता प्रत्येक कार्यकर्त्याने ताकदीने काम करा, उद्याचा विजय आपला आहे, असा विश्वास आणि उत्साह कार्यकर्त्यांच्या मनात भरण्याचे काम सुरेंद्र म्हात्रे यांनी केले.

नागाव आणि चौल या दोन्ही ठिकाणी विरोधी उमेदवाराने दादागिरी, फसवणूक आणि अन्याय केल्याचे आरोप करत, असे प्रकार चौलमध्ये खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. कोणत्याही दबावाला न जुमानता ताकदीने काम करा, विजय आपलाच आहे, असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केला. कार्यक्रमाच्या शेवटी ‘‘महाविकास आघाडीचा विजय असो’’, ‘‘लाल बावटा की जय’’, ‘‘शिवसेना जिंदाबाद’’ अशा गगनभेदी घोषणा देत परिसर दणाणून गेला. यावेळी मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## आगीत ४०० बकऱ्या होरपळल्या

१.३० ते २ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली असून, या दुर्घटनेत सुमारे ३०० ते ४०० बकऱ्या होरपळून मृत्युमुखी पडल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मध्यरात्री फार्म परिसरातून अचानक धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. काही मिनिटांतच आग बकरी पालन करण्यासाठी उभारलेल्या शेड्समध्ये पसरली. आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, बकऱ्यांना बाहेर काढण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. परिणामी, मोठ्या संख्येने मुक्या प्राण्यांचा दुर्दैवी अंत झाला.फार्म मालकाच्या म्हणण्यानुसार, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विद्युत वाहिन्यांमध्ये झालेल्या बिघाडामुळे ठिणग्या पडून आग भडकली असावी.घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतीस धाव घेतली, मात्र तोपर्यंत फार्मचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सुदैवाने या आगीत कोणतीही मनुष्यहानी झाली नाही. मात्र, बकरी पालनावर अवलंबून असलेल्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. महसूल व पशुसंवर्धन विभागाकडून पंचनामा सुरू असून, नुकसानभरपाईची मागणी करण्यात येत आहे.

## ‘ट्रान्सफॉर्मर गँग’ गजाआड

(एमएच ४३ सीई ८४०५) शोध सुरू करण्यात आला. २४जानेवारीरोजी ही कार नेरळ-कर्जत-बदलापूर मार्गावर संशयास्पदरित्या फिरताना आढळून आली. पोलिसांनी सापळा रचून कारमधील पाच जणांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नसीम नसीर साहा (२५), रोजन लतीफ अली (२७), मोहम्मद हनीफ फारूख (२४), इब्राहीम जान मोहम्मद खान (३१) व जकाउल्लाह मोहम्मद इब्राहीम खान (२६) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या कसून चौकशीत आरोपींनी धामोते येथील चोरीसह डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ दरम्यान कर्जत, खालापूर व खोपोली परिसरातील अनेक ट्रान्सफॉर्मर फोडून तांब्याच्या तारांची चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून सुमारे ४५० किलो तांब्याच्या तारा तसेच गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण १० लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या यशस्वी कारवाईमुळे नेरळ व कर्जत पोलिसांचे परिसरातून कौतुक होत आहे. या तपासात पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलीस उपनिरीक्षक सुशील कजरोळकर, सुशांत वरक (कर्जत पोलीस ठाणे) यांच्यासह पोलीस हवालदार येरूणकर, समीर भोईर, संतोष साळुंखे, वाघमारे, शिवाई केकान, आशू बेंद्रे व वांगणेकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## आंबेपूरमध्ये शेकाप उमेदवारांना ठाकरे गटाचा पाठिंबा

अर्ज मागे घेतला. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची त्यांनी भेट घेऊन ही निवडणूक नक्की जिंकणार असा विश्वास दिला. यावेळी छाया पिंगळे म्हणाल्या की, वरिष्ठांच्या आदेशानुसार अर्ज मागे घेतला आहे. शेकापकडून एक उच्च शिक्षित उमेदवार दिला आहे. सुशिक्षित उमेदवार या परिसरात मिळाल्याने त्यांच्या विजयाने या भागात एक चांगला बदल होईल, असा विश्वास आहे. सध्या आंबेपूरसह परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही मतदार, विशेषतः महिला मतदारांना धमकावून मत मिळवण्याचा प्रयत्न होतोय, असे दिसून आले आहे. या त्रासाला जनता आपली जागा दाखवून देईल आणि महाविकास आघाडी एकनिष्ठतेने काम करुन दहशतीवर आळा बसेल, असा विश्वासही पिंगळे यांनी व्यक्त केला.

## उमेदवारीचा ‘आस्वाद’ घेण्यापूर्वीच माघार

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जागांवर भाजप आणि शिंदे गटात अलिबागमध्ये वाद सुरु होते. चेंढरेसह अनेक जिल्हा परिषद मतदार संघात भाजपने उमेदवार उभे केले असताना, शिंदे गटानेदेखील उमेदवारी अर्ज भरले होते. त्यामुळे एकमेकांविरोधात रस्सीखेच सुरु होती. एकमेकांना पाण्यात बघण्याचे काम केले जात होते.

भाजपच्या एका उमेदवाराने शहापूर मतदार संघात उमेदवारी अर्ज भरला होता. शिंदे गटाकडून भाजपवर तीव्र टीका करण्यात आली होती. भाजपच्या या उमेदवारी अर्ज मागे घेण्यामागे नक्की काय भूमिका आहे, याबाबत चर्चेला उधाण आले आहे. शिंदे गटाविरोधात पुढील भाजपचे काय धोरण असणार याकडे अलिबागकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

# निवडक



## विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपचे वाटप

**म्हसळा :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून इंडिया चिल्ड्रेन झोन या सामाजिक संस्थेचे प्रमुख कमलेश मेहता व पारुलबेन मेहता यांच्या आर्थिक सहकार्याने समाजसेवक रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्या विशेष प्रयत्नातून जिजामाता हायस्कूल वरवठणे आगरवाडा येथे शिक्षण घेत असलेल्या ५० गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी २,००० रुपये प्रमाणे स्कॉलरशिपचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी इंडिया चिल्ड्रेन झोन संस्थेचे संस्थाप्रमुख माजी सभापती महादेवराव पाटील, संचालक मुकेश पाटील, शाळेचे मुख्याध्यापक संदिप कांबळेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. स्कॉलरशिप मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व उत्साह दिसून येत होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळा प्रशासन व उपस्थित पालकांनी इंडिया चिल्ड्रेन झोन संस्था तसेच सर्व सहकार्यकर्त्यांचे आभार मानले.



## राही साळवीचे पोलिसांकडून कौतुक

**महाड :** महाडच्या ऐतिहासिक न्यायालयात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात राही साळवीने केलेल्या प्रभावी भाषणाने उपस्थितांचे मन जिंकले. या न्यायालयाचे विशेष ऐतिहासिक महत्त्व म्हणजे जिथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समानतेची ज्योत प्रज्वलित केली. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथेच सत्याग्रहाद्वारे सर्वांना चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क मिळवून दिला होता. त्याच ठिकाणी आज एका आठ वर्षाच्या लहानग्या राहीने देशाच्या ऐक्य, विकास आणि संविधान मूल्यांची भक्कम बाजू मांडली. याप्रसंगी ॲड. गणेशजी कारंजकर आणि ॲड. संदीप सर्कले या दोघांनी राहीला व्यासपीठावर बोलण्याची संधी मिळण्यासाठी विशेष मेहनत घेतली आणि तिचे मार्गदर्शन केले. त्यांच्या सहकार्यामुळेच राहीला. या ऐतिहासिक न्यायालयातील कार्यक्रमात भाषण करण्याची संधी प्राप्त झाली. या मोलाच्या योगदानाबद्दल राहीच्या कुटुंबियांनी त्यांचे मनः पूर्वक आभार मानले.



## उरणमध्ये व्यसनमुक्तीविषयी मार्गदर्शन

**उरण :** प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने उरण पोलीस विभागाच्या सहकार्याने उरण पोलीस स्टेशन येथे जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात दारू व अंमली पदार्थांच्या व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत असलेले दार्शनिक दृष्टीकोनातून काम करणारे दर्शन नाईक व त्यांच्या व्यसनमुक्ती समुदायातील काही सहकारी सहभागी झाले होते. या प्रसंगी दर्शन नाईक यांनी उरण परिसरात वाढत चाललेल्या अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपानाचे व्यसन तसेच स्क्रीन (मोबाईल/डिजिटल) व्यसन याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. या व्यसनांचा युवकांवर, कुटुंबव्यवस्थेवर आणि सामाजिक सुरक्षिततेवर होणारा परिणाम त्यांनी सविस्तरपणे मांडला. कार्यक्रमादरम्यान व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध असलेली मदत, बैठकींची रचना, गोपनीयता, तसेच गरजूंना योग्य दिशेने मार्गदर्शन कसे करता येईल याबाबत उपयुक्त माहिती व दृष्टिकोन देण्यात आला.

## उरण महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, लिओ क्लब उरण, टायगर ग्रुप, राजे शिवाजी मित्र मंडळ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले. यावेळी महात्मा गांधी मिशन कामोठे नवी मुंबईच्या



ब्लड बँकेचे सहाय्य घेण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. गर्जे, एम.जे.एफ.ला.मा. सदानंद गायकवाड, लायन्स क्लबचे अध्यक्ष मा. रावसाहेब ओहळ, उपाध्यक्ष ला. संदीप सदानंद गायकवाड, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. विशाल पाटेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये दुसऱ्यांदा रक्तदान शिबीर आयोजित केल. या शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली.

## धनंजय जाधव यांना पुरस्कार

**नेरळ :** रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय मतदार दिनी गौरव निवडणूक कामातील योगदानाची दखल घेत कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रीय मतदार दिनी गौरविण्यात आले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दरवर्षीप्रमाणे यंदाही २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित विशेष सोहळ्यात कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना ‘उत्कृष्ट साहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी पुरस्कार २०२६’ देऊन सन्मानित करण्यात आले. रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२५ या वर्षभरात मतदार यादीचे अद्ययावतीकरण, मतदारांच्या तक्रारींचे जलद निवारण आणि निवडणूक प्रक्रियेत राबविलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी तहसीलदार जाधव यांची निवड करण्यात आली.

# जिल्हाभर भारत मातेचा जयघोष

**संपूर्ण जिल्हाभर सोमवारी भारताचा प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी ध्वजास मानवंदना देत भारतमातेचे गीत आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. दरम्यान, अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**



● मुरुडच्या सार्वजनिक बांधकाम विभागात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडे, दर्शन मिठाग्री, विजेंद्र कासार, संदिप माने, सागर कोदेरे उपस्थित होते.



● ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या वेश्वी संकुलात पीएनपी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते, रिना म्हात्रे, प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्राचार्य रविंद्र पाटील, निसर्गा चेवले, वेल्लईम्मल्ल, प्रा. ऋतिषा पाटील, तेजस म्हात्रे, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक इतर मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● नवी मुंबईतील कलंबोली पोलीस आयुक्तालयाच्या मैदानावर परेड सादर करण्यात आली. (छायाचित्र. राजेश डांगळे)

## निवडक

### वांगणी हायस्कूलतर्फे प्रभातफेरी



**सुकेळी :** नागोठणे जवळच असलेल्या वांगणी हायस्कूल तसेच प्राथमिक शाळा बाळसई येथे देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्राथमिक शाळेमध्ये शाळेच्या शिक्षिका सपना डोंगरे तसेच सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय वांगणी हायस्कूलमध्ये महादेव साबळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, समुहगीत सादर करुन बाळसई गावातुन प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीमध्ये भारत माता की जय, स्वंतत्र भारताचा विजय असो अशा घोषणांनी संपूर्ण बाळसई गाव दणाणून गेला होता. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझिम पथक व कवायतीने सर्वांचेच लक्ष वेधून घेत अनेकांची मने जिंकून घेतली. यावेळी स्थानिक शाळा समिती अध्यक्ष मधुकर ठमके, सुनिल नावळे, महादेव साबळे, सपना डोंगरे, शाळेतील शिक्षकवर्ग , अंगणवाडी सेविका त्याचप्रमाणे बाळसई ग्रामस्थ, बचत गटांच्या सर्व महिला, तरुण वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लक्ष्मी पाईप कंपनीत ध्वजारोहण

**सुतारवाडी :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सुतारवाडी येथील किरण गुणपाल लडगे यांच्या लक्ष्मी पाईप कंपनीमध्ये कोल्हापूर येथील इंडस्ट्रियल क्रेनचे राजकुमार चंद्रेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. गेल्या पस्तीस वर्षापासून कंपनीच्या स्थापनेपासून या ठिकाणी प्रजासत्ताक दिन स्वातंत्र्य दिन उत्साही वातावरणात साजरे केले जात आहे. यावर्षीही द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कंपनीचे अधिकारी, कर्मचारी वर्ग, तसेच महिलांच्या उपस्थितीत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### कामगार कल्याण मंडळात प्रतिज्ञेचे वाचन



**पनवेल :** कामगार आणि सामाजिक कार्यामध्ये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वर्तक नगर, ठाणे केंद्राने मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा केला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी, अरविंद मोरे, आशिष सुर्वे, एच. आर. रमेश हौदे, रिया कुमारी, भिकू जाधव, केदार म्हात्रे, प्रवीण सकट, आशिष सुर्वे उपस्थित होते. अरविंद मोरे यांनी प्रतिज्ञेचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे केंद्र प्रमुख प्रवीण सकट यांनी केले.

### यु. ई. एस. स्कूलमध्ये समूहगीत सादर

**उरण :** यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स एण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी ध्वजवंदन करुन मानवंदना दिली. त्यानंतर माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली भारतमातेला समर्पित असे जोशपूर्ण समूहगीत सादर केले. प्रजासत्ताक दिनी व्यासपीठावर यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, अ‍ॅड. राजेंद्र भानुशाली, अ‍ॅड. अपूर्वा ठाकूर, तनसुख जैन, प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे, पीटीए सदस्य, शिक्षकगण, शिक्षकेतर कर्मचारी, हा सोहळा पाहण्यासाठी मोठया संख्येने पालक उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३

● **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२

● **जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी** व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

● **दिशा पॅथॉलॉजी लॅब –रेवदंडा व चोंढी** येथील कलेक्शन सेंटरसाठी ब्लड कलेक्शन टेक्निशियन /नर्स/फ्लेबोटॉमिस्ट (अनुभवी)/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९

● **अलिबागमधील शॉपमध्ये** काम करण्यासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ९४२२६९६२३५

● **घरकामासाठी सकाळच्या वेळेत बाई पाहिजे.** अर्धवेळसाठी ८ ते ११–३० स्थळ : पंतनगर, संपर्क : ८०९७२०५९३९, ९४२२३७५१२४

● **पाहिजे :** अलिबागमधील वृद्ध जोडप्यास भाजीबाजार आणून देण्यासाठी रोजच्या रोज दोन तासासाठी व्यक्ती, विद्यार्थ्यांस पसंती. पगार पाच हजार. संपर्क :८५३०३०९७६५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## मुरूडमध्ये तिरंग्याला सलामी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरूड शहरातील शासकीय निमशासकीय कार्यालयावर ध्वजारोहण करुन ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन तिरंग्याच्या जयघोषात करण्यात आला. तसेच मुरूड जंजिरा नगरपरिषद प्रांगणातील राजे शिवछत्रपती महाराजांना नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. तद्नंतर मुरुड जंजिरा नगरपरिषदेवर उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, पांडुरंग आरेकर, यास्मिन कादिरी, नगमाना खानजादे, रुपेश रणदिवे, मनोज भगत, प्रिती चौलकर, आदेश दांडेकर, तमीम ढाकम, मनिष विरकुड, नितिन आबुर्ले, अंकिता गुरव, वैदेही आरेकर, श्रीकांत खोत, रुपेश पाटील, अ‍ॅड. रुपेश पाटील, नंदकुमार आंबेतकर, सतेज निमकर, तुप्ती पाटील, संदिप पाटील, मंगेश दांडेकर, डॉ. राज कल्याणी, डॉ. मयूर कल्याणी, प्रकाश आरेकर, मोहन करंदेकर आदिंसह नगरपरिषद शाळा व सर एस ए हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

## रुद्र थिटेकरला ध्वज फडकविण्याचा मान

**। तळा । प्रतिनिधी ।**



तळा तालुक्यात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय आदी ठिकाणी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा उत्साह पहायला मिळाला. रायगड जिल्हा परिषदेच्या तळे मराठी शाळेत नवोदय परीक्षा उत्तीर्ण झालेल्या रुद्र थिटेकर या विद्यार्थ्याला ध्वज फडकविण्याचा मान देण्यात आला. नगरपंचायत येथे नगराध्यक्षा माधुरी घोलप यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. तसेच तहसील कार्यालय तळा येथे तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते तालुक्याचे शासकीय ध्वजवंदन पार पडले.

यावेळी तहसीलदारांच्या दालनात तहसीलदार स्वाती पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवरांना ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी तालुक्यातील प्रतिष्ठित मान्यवर, शासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

● संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे प्रजासत्ताक दिनी संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे ध्वजवंदन करताना.



## म्हसळ्यात देशभक्तीपर गीते सादर

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन विविध कार्यक्रमांच्या आयोजनातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्याचा मुख्य शासकीय ध्वजवंदन समारंभ राजीप कन्या शाळेच्या प्रांगणात तहसीलदार सचिन खाडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उप पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी ध्वजारोहण, देशभक्तीपर वातावरणात राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, ध्वजगीत आणि साक्षरते बाबत सामूहिक शपथ घेण्यात आली.

पंचायत समिती म्हसळा येथे गटविकास अधिकारी माधव जाधव, पोलीस ठाण्याचे रविंद्र पारखे, नगराध्यक्षा बशारत, ग्रामीण रुग्णालयात डॉ. प्रतीक गवई, केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात संजय खांबेटे, जिजामाता शिक्षण संस्था येथे संस्थापक अध्यक्ष महादेव पाटील, न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे प्राचार्य डी. आर. पाटील, वसंतराव नाईक महाविद्यालय येथे चेअरमन फजल हळदे तसेच राजीप शाळा क्रमांक १ येथे पालक समितीच्या उपाध्यक्ष स्नेहल निजामपूरकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

## मोठीजुई शाळेत संगीतमय कवायत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राजिप शाळा मोठीजुई शाळेत ७७ वा. प्रजासत्ताक दिन उत्साहात आणि संगीतमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावर्षीच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली संगीतमय कवायतींचे सादरीकरण. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या आणि कलात्मक सादरीकरणाचे सर्वत्र कौतुक झाले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

## कर्जतमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात ७७ व्या प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजवंदन करण्यात आले. तालुक्यातील शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय, नगरपरिषद, ग्रामपंचायत कार्यालय आदी ठिकाणी ध्वजवंदन करण्यात आले.

पोलीस मैदानात उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसील कार्यालयात तहसीलदार धनंजय जाधव, पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकारी सुशांत पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

नगरपरिषद कार्यालायातील ध्वजवंदन नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी पुंडलिक पाटील, संतोष पाटील, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, शरद लाड, राजेश लाड, वनिता म्हसे, रजनी गायकवाड, सुवर्णा जोशी, राजाभाऊ कोठारी, नितीन परमार, राजेंद्र दगडे, बळवंत घुमरे, डॉ. रंजना देशमुख, नवनाथ दाभाडे, अंकिता जांभळे आदी उपस्थित होते.

## ध्वजवंदनाचा दिव्यांग बंधूना मान

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पंचायत समिती खालापूर येथे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्यानिमित्ताने ध्वजवंदनाचा मान दिव्यांग दीपक पाटील यांना दिला. खालापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी कराड यांनी ध्वजवंदनाचा मान दिव्यांग दीपक पाटील यांना देऊन लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. त्यामुळे उपस्थित नागरिकांनी गट विकास अधिकाऱ्यांच्या कृतीचे कौतुक केले. यावेळी पंचायत समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नावलौकिक वाढविणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा सन्मान



**। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।**

बोर्लीपंचतन ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर यांच्या हस्ते तर छत्रपती शिवाजी महाराज चौकामधल्या मुख्य सोहळयात मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रामपंचायतीचे प्रशासकीय अधिकारी किशोर नागे यांनी ध्वजवंदन केले. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदानातून आपल्या गावाचा नावलौकिक वाढविणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा सन्मान करण्यात आला.

यात दुर्गप्रेमी मिलिंद जाधव श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्याबरोबरच राज्य व राष्ट्रीय पातळीवर यश मिळवणाऱ्या खेळाडूंचाही सन्मान करण्यात आला. अनुष्का पयेर हिची राष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात तर आदित्य शिगवण याची महाराष्ट्र ज्युनिअर आट्यापाट्या संघात झालेली निवड, सार्थक मयेकर याने शालेय विभाग स्तरीय कराटे स्पर्धेत मिळवलेला द्वितीय क्रमांक,तनिष्का तोडणकर हिने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखवणाऱ्या खेळाडूंना शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. या सोहळ्यास गावातील ग्रामपंचायत कर्मचारी, अधिकारी, शाळांचे शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## मंडळ अधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पोयनाड विभाग मंडळ अधिकारी कार्यालयाच्या वतीने भारत देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाडचे विद्यमान नायब तहसीलदार महेश निकम यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी श्रीगावचे तलाठी मनोज वाडकर, निवृत नायब तहसीलदार अलिबाग प्रकाश तिवरेकर, पोयनाड मंडळ अधिकारी कार्यालयाचे कोतवाल देवेंद्र ओव्हाळ, कोतवाल शहापूर, विजय पाटील, विनोद पाटील, रोशन पाटील, अर्चना राऊत यांच्या सह पोयनाडचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीची प्रभात फेरी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्या संकुलनात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पी. पी. खारपाटील यांच्या हस्ते ध्वजंदन केले. या अनुषंगाने शासन अंतर्गत विद्यार्थ्यांनी कवायती व देशभक्तीपर नृत्य–गीते, व भाषणे सादर केली.

तदनंतर प्रथेप्रमाणे, हुतात्मा स्मारक, महागणपती मंदिर, प्राथमिक केंद्र शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलीस चौकी व छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत प्रभात फेरी काढण्यात आली.

यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी उपाध्यक्ष राजाशेठ खारपाटील, संचालिका श्रद्धा खारपाटील, प्रशासकीय अधिकारी व्ही. ए. पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, शिक्षक प्रतिनिधी जिचंद भगत कार्याध्यक्ष विजय पवार इंग्रजी माध्यम मुख्याध्यपिका सुप्रिया पाटील,मंदा घरत, स्मिता मसुरकर, आजी–माजी पालक शाळा कमिटीचे सदस्य, माजी विद्यार्थी, शिक्षकांवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## विशेष कामगिरी करण्यांचा गौरव

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त उरण तहसिलदार डॉ .उद्धव कदम यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम तहसिल कार्यालय उरण येथील प्ररांगणात झाले. याप्रसंगी विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्यांचा प्रशिस्ती पत्रक देवून गौरव करण्यात आला. यावेळी उरण नगराध्यक्ष भावना घाणेकर, नायब तहसिलदार नरेश पेढवी, नायब तहसिलदार महेश पाटील, हनीफ मुलानी, रमेश ठाकूर, परीक्षित ठाकूर, सीमा घरत, नरेश रहाळकर, गोपाळ पाटील, संदेश ठाकूर, सदानंद गायकवाड, मार्तंड नाखवा, प्रवीण पुरो, महेंद्र ठाकूर, आदी उपस्थित होते.

## महाकाली तरुण मंडळातर्फे रक्तदान शिबीर



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी पेण शहरातील महाकाली तरुण मंडळ व त्वष्टा कासार समाज मंदिर पेण तसेच लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पेण शहरातील महाकाली मंदिरात मोफत नेत्र चिकित्सा मोतीबिंदू शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराला पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी भेट देऊन रक्तदान केले, त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

पेण शहरातील नागरिकांनी नेत्र चिकित्सा शिबीर आणि मोतीबिंदू शिबिराचा ६८ नागरिकांनी लाभ घेतला. तर महिला व पुरुष असे ६० जणांनी रक्तदान केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी महाकाली तरुण मंडळाचे अध्यक्ष कल्पेश हजारे, उपाध्यक्ष प्रथमेश चाचड, सेक्रेटरी प्रथमेश पोटफोडे, खजिनदार ऋषिकेश गोडे,अनंत हजारे, मयुरेश चाचड, मिलिंद समेळ, मंगेश हजारे, अ‍ॅड. अध्यक्ष हेमंत वडके, तेजस समेळ, राजश्री पोटफोडे, सागर हजारे, शिला हजारे आदीनी मेहनत येऊन शिबीर यशस्वी केला.

# प्रा.डॉ.हन्नत शेख यांना पीएचडी प्राप्त

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण रायगड येथील अकाउंट अँड फायनान्स विभागातील प्रा.हन्नत शेख यांना मुंबई विद्यापीठाच्या वतीने पीएचडी प्रदान करण्यात आली. उरण महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. पि.आर.कारुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी व्यापार धोरण आणि प्रशासन या विषयातून मुंबई विद्यापीठाची संशोधन पदवी प्राप्त केली आहे. उरण महाविद्यायाच्या वाणिज्य विभागातील संशोधन केंद्रातून त्या पीएचडी प्राप्त प्रथम विद्यार्थिनी ठरल्या आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-चिंचोटी ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ८८/१/ब/२ क्षेत्र ०-४८-३० हे. आर., पो.ख.०-०७-३० हे.आर., एकूण क्षेत्र ०-५५-६० हे. आर., आकार ९.९१ रू.पैसे सदरहू मिळकतीपैकी क्षेत्र ०-१३-३७ हे.आर.,पो.ख. ०-०१-८३ हे.आर; एकुण ०-१५-२० आकार २.७४ रू.पैसे ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक चंद्रकांत रामचंद्र पाटील वगैरे मु. चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,

तारीख : २७/०१/२०२६

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. नितेश बळीराम मयेकर, रा. घर नं. १७४ अ, सेक्टर १०, कोपरा गाव, पो. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६३/३/अ/५ | ०.२०.९०<br>पो.ख. ०.०१.१० | ०.१९ | हमजेखान उस्मान मुल्ला |
| | एकुण ०.२२.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत

दिनांक :- २८/०१/२०२६.

सही/-
**अॅड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

प्रोसेस जमा रू. — अर्जदारांतर्फे वकील
जाहीर नोटीस — अॅड. संजय दत्तात्रेय म्हात्रे
निशाणी क्रमांक

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.२१४/२०२५

टीना उत्तम ओसवाल ... अर्जदार
विरूद्ध,
कोणीही नाही. ... सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेंत येते की, टीना उत्तम ओसवाल यांनी कै. उत्तम हनुमानमलजी ओसवाल यांच्या मालकीची मौजे अलिबाग, महर्षी कर्वे रोड, मारूती नाका, ता. अलिबाग, येथील सिटी सर्व्हे नंबर ए ८९७, बी ८९७, के ८९७, ए ८९८, बी ८९८, के ८९८, ८९८/१, ८९८/२, ९००/ए/१, ८९९, ९००/के/ए/(९००ड), ९०१, ९००/के/सी, ९००/ए/४, ९००/ए/३, ९००/ए/२, ९००/२, ९००/ए/३, ९०४/१, ९०२, के ९०० बी एकुण क्षेत्र २४८६.९३ चौ मीटर या मिळकतीवरील 'कुबेराक्षे सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या' बिल्डींग क्र. ०१ मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ए २०४ क्षेत्र ३८.६० चौ.मीटर, रेरा कारपेट व १०.२२ चौ.मीटर बाल्कनी व १.०२ चौ मीटर कपबर्ड व १२.०८ मीटर टेरेस, रेरा क्र. पी ५२०००१९६९८ अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000005072 या मिळकतींबाबत अर्जदार यांच्या नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन अॅक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही सदर मिळकतींमध्ये कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध नाही तसेच अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही कै. उत्तम हनुमानमलजी ओसवाल यांना वारस नाहीत. असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाचही वर नमुद मिळकतींमध्ये कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा कै. उत्तम हनुमानमलजी ओसवाल यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक / / २०२५ रोजी सकाळी ११ वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक / /२०२५ रोजी या जाहिर नोटीसला अनुसरून अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे लाभात वर नमुद मिळकतींबाबत वारस दाखला जारी करणेची पुढील कार्यवाही करेल, याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

**कनिष्ठ लिपीक** — **अधिक्षक, दिवाणी न्यायालय,**
अलिबाग वरीष्ठ स्तर

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चौल दक्षिण भाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक सौ. धरती निलेश राऊत रा. चौल काटकर आळी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करारनामा विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल दक्षिण ता. अलिबाग | २३१०/२ | ०-४८-६०<br>पो.ख. ०-०४-८०<br>एकूण ०-५३-४० | २७.६० |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी सौ. धरती निलेश राऊत हिच्या मालकीहक्कात असलेले ०-०२-१० हे.आर.आकार रू. १.१९ पैसे ही बागायत मिळकत

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू गवत बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०१/२०२६

सही/-
**अॅड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पळस, तालुका - रोहा, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत यांनी विद्यमान मालक व कब्जेदार यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे पळस, तालुका - रोहा, जिल्हा - रायगड येथील**

| मालक | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| धर्मेश किशोर गटानी | ८१ | ०-१०-४० | १.८१ |
| धर्मेश किशोर गटानी | ८०/१ | ०-२८-९० | ५.१६ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत करारनामा अथवा इतर हक्का हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणारे यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक २८/०१/२०२६

येणेप्रमाणे जाहीर नोटिस

सही/-
Adv. Aysha Hyka Saleem
ऑफिस ४०१ -४०५, आय विंग,
अरेंजा प्लाझा, प्लॉट नं. ५२, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो.नं. ८६९२०३८५६७

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक यांच्या वतीने, वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, कारवार यांचे द्वारे पुढील कामासाठी **www.ireps.gov.in** प्रणालीवर खुली ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**अ.क्र.: 1. कामाचे नाव**: गोवा राज्यातील कोकण रेल्वेच्या एसईएन/एमएओ विभागामधील पेरनेम टनेलच्या आत स्वतंत्र ठिकाणी कि.मी. 384/740 ते 384/765 दरम्यान 25 मीटर लांबीसाठी फॉर्मेशन ग्राउटिंगचे काम तसेच कि.मी. 383/580 ते 384/960 दरम्यान पीयू ग्राउटिंगचे काम करणे (कंप्युटर क्र.: 69635). **निविदा सूचना क्र.: केआर/केडब्ल्यू/ओएल/डब्ल्यू/2026/03-आरबी. कामाची किंमत (लाखांमध्ये)**: रु. 327.72 (जीएसटी वगळून). **समापन दिनांक व वेळ**: 18.02.2026 रोजी 15:00 वा.

**अ.क्र.: 2. कामाचे नाव**: गोवा राज्यातील कोकण रेल्वेच्या एसईएन/एमएओ विभागामधील ओल्ड गोवा टनेलच्या आत फॉर्मेशन ग्राउटिंग (कि.मी. 412/070 - 412/110 आणि कि.मी. 412/200 - 412/225) तसेच स्टील लाइनिंग (कि.मी. 412/010 - 412/030 आणि कि.मी. 411/935 - 411/945) चे काम करणे (कंप्युटर क्र.: 69323). **निविदा सूचना क्र.: केआर/केडब्ल्यू/ओएल/डब्ल्यू/2026/04-आरबी. कामाची किंमत (लाखांमध्ये)**: रु. 382.34 (जीएसटी वगळून). **समापन दिनांक व वेळ**: 18.02.2026 रोजी 15.00 वा.

अधिक माहितीसाठी वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., कारवार यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. अधिक तपशीलांसाठी (**https://www.ireps.gov.in**) येथे भेट द्यावी.

## जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार याखाली दिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन केलेल्या जमिनीच्या **("जमीन")** अधिकार, शिर्षक आणि हितसंबंधाबाबत सोंडवाडी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे राहणारे भारतीय, वय २९ वर्ष असलेले, शेतकरी **गणेश भाऊ खडके** (पॅन: EHAPK7361H) **("मालक")** यांच्या मालकी हक्काची आम्ही चौकशी करीत आहोत.

कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींचे / एन्टीटींचे / संस्थेचे जमिनीत किंवा जमिनीच्या कोणत्याही भागावर विक्री, विक्रीसाठी करार, सामंजस्य करार, हस्तांतरण, नियुक्ती, विनिमय, वितरण, भार, ऋणभार, कुळ, उपकुळ, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, परवाना, गहाणवट (न्याय्ययोग्य किंवा अन्यथा), वारसा, वहिवाट, ताबा, विभाजन, हिस्सा, भेट, योजना, धारणाधिकार, शुल्क, नियमित खर्च, विकास हक्काचे अनुदान, देखभाल, सुविधाधिकार, मार्गाचा अधिकार, विश्वस्त, प्रसंविदा किंवा अट, मुक्तता, त्याग, संपादन, मागणी, कोणत्याही ट्रस्टअंतर्गत कोणताही भार किंवा फायदेशीर हक्क / हित, कोणत्याही करार, संविदा, डीड, दस्तऐवज, लेखन, अभिहस्तांतरणद्वारे प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा इतर कोणत्याही पद्धतीने, योजना, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/ तडजोड, एफएसआय, विल्हेवाट, खटला, कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाने किंवा लवादाने पारित केलेली डिक्री किंवा आदेश किंवा निवाडा किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हिस्सा, अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी (प्रत्येक्ष किंवा अप्रत्येक्ष) आहे आणि असल्याचा दावा करीत असल्यास **("दावे")** त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीकरींना **खैतान अॅण्ड कंपनी**, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अभिराज गांधी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत संपूर्ण आणि प्रमाणित सत्य प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, असे मानले जाईल की दावेदारांनी असे दावे सोडुन दिले आहेत किंवा असे दावे, जर असतील तर, सर्व हेतू आणि उद्देशासाठी जाणीवपूर्वक माफ केले आहेत, दुर्लक्ष केले आहेत, सोडले दिले आहेत आणि स्विकार केले आहेत आणि यापुढे ते मालक आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

### अनुसूची
(जमिनीचे वर्णन)

गाव भिलावले, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित नविन सर्व्हे क्रमांक ४१/४/ए (जुना सर्व्हे क्रमांक ४१/४ + 5+६ संबंधित) असलेला मोजमापीत १ हेक्टर ०६.१० आर्स (म्हणजेच १०,६१० चौरस मिटर्स) जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

उत्तरेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ३९/१ आणि ३९/२
दक्षिणेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ४१/२, ४२/३ आणि सर्व्हे क्रमांक ४५
पूर्वेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ४०
पश्चिमेकडे वा त्या दिशेला : सर्व्हे क्रमांक ४२/१, ४२/२ आणि सर्व्हे क्रमांक ३८/३

आज दिनांक २८ जानेवारी २०२५

खैतान अॅन्ड कंपनी करीता
सही /–
अभिराज गांधी
भागीदार

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सचिन उत्तमचंद ओसवाल यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १६/२० | एकुण क्षेत्र ०-२३-०० हे आर पॉ | ०-५० |
| १६/२२ | एकुण क्षेत्र ०-१४-०० हे आर पॉ | ०-२५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २८/०१/२०२६

खरेदीदारातर्फे वकील अॅड. वृषाली रघुनाथ मोरे
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील अॅड. निलेश कान्हु मोरे
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड. कर्जत ता. कर्जत,
जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. कैलाश वाळकू ऐनकर यांनी मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन : मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. राम पांडुरंग परदेशी | २२ | ६ | ०-२३-०० | ०-१६ |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अॅटचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. २८/०१/२०२६

**अॅड. निलेश रखमाजी पादीर**
मो.९७६७६३७१००
९२७२५६२१५८.

**अॅड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९८५०७६७५६८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-लिलाव सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचेमार्फत पुढील कार्यक्रमानुसार व्यावसायिक करारांचे ई-लिलाव आयोजित करण्यात येत असून याचे प्रकाशन आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर करण्यात आले आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉटची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ट्रेनमध्ये जाहिरातींचे प्रदर्शन – मडगांव - मँगलोर-मडगांव (10107/10108) मेमू ट्रेन आणि दिवा-सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) | 02 | 29.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 2 | मडगांव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 29.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 3 | ट्रेनच्या बाहेर जाहिरातींचे प्रदर्शन – दिवा-सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106), दिवा-रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोंकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) | 03 | 30.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 4 | माणगाव, वीर, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, अस्नोटी, अंकोला, गोकर्ण रोड, बारकुर, आणि मुल्की येथे पे पार्किंग | 14 | 30.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 5 | एसएलआर भाड्याने देणे - गाड्या क्रमांक 11004, 20112, 10104, 22907 | 04 | 30.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 6 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिजजवळील होर्डिंग्जद्वारे जाहिराती - महाराष्ट्र | 07 | 31.01.2025 रोजी 11:00 वाजता |
| 7 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकळ आणि सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकरची स्थापना | 08 | 31.01.2026 रोजी 11:00 वाजता |
| 8 | चिपळूण, रत्नागिरी, थिविम, करमळी, मडगाव, कारवार आणि सुरतकल स्थानकांवरील बोर्ड आणि होर्डिंगद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 07 | 02.02.2026 रोजी 11:00 वाजता |
| 9 | चिपळूण, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, थिविम, करमळी आणि मडगाव या स्थानकांवर फेअर रिपीटर बसवणे | 08 | 03.02.2026 रोजी 11:00 वाजता |
| 10 | थिविम आणि करमळी येथील एफओबीज वरील जाहिरात फलकांद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 02 | 04.02.2026 रोजी 11:00 वाजता |
| 11 | चिपळूण, करमळी आणि कारवार येथे स्टेशन परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे कमर्शियल पब्लिसिटी | 03 | 05.02.2026 रोजी 11:00 वाजता |
| 12 | माणगाव, खेड, चिपळूण, करमळी आणि कारवार येथे पे अँड युज टॉयलेट सुविधा | 05 | 05.02.2026 रोजी 11:00 वाजता |

**कोणत्याही शंका निरसनासाठी कृपया संपर्क साधा: 1.** श्री. प्रविण डावरे, **मो. क्र.**: 9004470597. **2.** श्री. विनय गावकर, **मो. क्र.**: 9004476129. **3.** श्री. मधुकुमार शेट्टी, **मो. क्र.**: 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळ **www.ireps.gov.in** पहा.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रभाकर नथु शेळके, रा. किरवली, ता.कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहु शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-एकसळ, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न./हि.नं. | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| राधाबाई कृष्णा लदगे<br>भारत कृष्णा लदगे | ३९/२ | ००-२३-५० हे.आर.प्रति<br>००-२८-६० हे.आर.प्रति | ० रु ६९ पैसे<br>० रु. ८६ पैसे |
| सजन कृष्णा लदगे<br>सुजाता संतोष मुंढे<br>अरुणा ज्ञानेश्वर भगत<br>साधना किशोर मुंढे | ३९/१ | एकूण क्षेत्र ००-५२-१० हे.आर.प्रति. | |

सदरहु वर नमुद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबेकब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरुन तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तद्‌ंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरुपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २८-०१-२०२६

सही/-
**अॅड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी)
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगळे आळी कर्जत पूर्व
कर्जत- रायगड मो.नं.९८८११३२२४८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत व त्यावरील घर मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शंकर जगन्नाथ कोळी व राकेश शंकर कोळी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १६३ | ९ | २०-०८-००<br>पैकी १०-०४-००<br>इतके लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र | २०८-०० |

व त्यावरील मांडवणे ग्रामपंचायत घर नं. १३ व १०६

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन २१ (एकवीस) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत

ता. २८/०१/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, कर्जत, रायगड

## सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय

काँग्रेस भवन ट्रस्ट, तळ मजला, टिळक रोड, अलिबाग, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव व अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

अर्जदार बालाजी कॉर्नर सहकारी गृहनिर्माण संस्था म.मुद्रे दहिवली, ता.कर्जत जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) मे बालाजी डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.१) श्री आर. पी. गोयल, शिव ओम अपार्टमेंट, तळ मजला, मुद्रे बु.ता.कर्जत पेंडदे १.२) श्री हायसुहिन शेख उर्फ शम शुद्दीन शेख, रा.छोटू टेरेस, ई/१४, चौथा मजला, एन.ए सावंत मार्ग, कुलाबा मुंबई १.३) श्री मदनलाल किशोरीलाल कुमावत, हिल पॅलेस, प्लॉट .३,४०४, कोकणी दादा पार्क पोखरण रोड, ठाणे २) श्री मुरारीलाल जे. कुमावत, प्लॉट नं. ३१, सेक्टर १ए, सिडको सर्वीस इंडऐरीया, आदर्श हॉटेलच्या मागे, कोपरखैरणे, नवी मुंबई यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**दहिवली तर्फे निड ता.कर्जत जि. रायगड येथील भू.क्र. व उपविभाग १०/१/१४ क्षेत्रफळ ४५९.८० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली आहे. गैरअर्जदार हे सुनावणीस उपस्थित नाहीत अगर त्यांचे म्हणणे प्राप्त नाही. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत आहे तसेच वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २७/०१/२०२६

सही/-
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर सूचना नोटीस/ Caution Notice

सर्व लोकांना विशेषतः रायगड जिल्ह्यामधील पाली सुधागड तालुक्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे असे सूचित करण्यात येते की मौजे वासुंडे, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील मिळकत ह्यांसी गट क्रमांक १४९ (जिचा उल्लेख ह्या नंतर सोयीसाठी विषयांकित मिळकत असा केलेला आहे.) हि मिळकत गेल्या पंचवीस वर्षापासून अधिक काळ श्री विनायक बाळकृष्ण क्षीरसागर व्यवस्थापकीय संचालक श्री स्थापत्य प्रायव्हेट लिमिटेड ह्या आमच्या अशिलांच्या प्रत्यक्ष ताबेवहीवाटीमध्ये मालक आणि कब्जेदार म्हणून आहे आणि आमचे अशील निरंतरपणे कोणत्याही अडथळ्याच्या विना तिचा मालक म्हणून उपभोग घेत आहेत. त्याचबरोबर आमच्या अशिलांनी सदर मिळकतीचे काही भाग मोबदल्यापोटी ३४ खरेदीदारांना देखील तबदील केलेले आहेत.

असे असताना नुकतेच आमच्या अशिलांना असे समजले आहे कि, श्री जनक कुमार विल्लयतीराम खन्ना,श्री मनोज जनक खन्ना, सौ सुमन जनक खन्ना व श्री गौतम जनक खन्ना सर्व खन्ना कुटुंबीय ह्यांनी एकत्रितरीत्या विषयांकित मिळकतीच्या संदर्भात काही तथाकथित हक्क तथाकथित अखत्यारी श्री गणेश लक्ष्मण कानडे आणि श्री नोएल सॅमसन चिंचोलकर ह्यांना देणारा/तबदील करणारा कुलमुखत्यार पत्राचा एक बेकायदेशीर दस्त आमच्या तसेच उपरोक्त सर्व ३४ लोकांच्या ज्यांची नावे गट क्रमांक १४९ ह्या मिळकतीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर अनेक वर्षापासून लागलेली आहे त्या सर्वांच्या संमतीशिवाय आणि त्या संदर्भातील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता नोंदवलेला आहे. नुसते एवढेच नाही तर ह्या सर्व व्यक्तींनी त्या बेकायदेशीर कुलमुखत्यार पत्राच्या दस्ताच्या आधारे वेगवेगळ्या बेकायदेशीर कृत्यांची एक मालिका सुरू केलेली आहे.

ह्या परिस्थितीमध्ये आम्ही या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की आमच्या अशिलांच्या मालकी वहिवाटीच्या मिळकतीच्या संदर्भात असा उपरोक्त कुलमुखत्यार पत्राचा बेकायदेशीर दस्त आमच्या तसेच उपरोक्त सर्व ३४ लोकांच्या संमतीशिवाय आणि त्या संदर्भातील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता श्री जनक कुमार विल्लयतीराम खन्ना, श्री.मनोज जनक खन्ना, सौ सुमन जनक खन्ना व श्री गौतम जनक खन्ना सर्व खन्ना कुटुंबीय ह्यांनी आणि तथाकथित अखत्यारी श्री गणेश लक्ष्मण कानडे आणि श्री नोएल सॅम सन चिंचोलकर ह्यांनी एकत्रितरीत्या नोंदवल्याचे आमच्या अशिलांच्या लक्षात आल्यानंतर आमच्या अशिलांनी त्या संदर्भात मेहेरबान नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे ह्या सर्वांच्या विरोधात एक औपचारिक तक्रार केलेली आहे आणि सदर तक्रारीची चौकशी आजरोजी चालू आहे. तसेच आमचे अशील मे. उप अधीक्षक (ग्रामीण) रायगड पोलीस अलिबाग यांच्याकडे ह्या सर्वांच्या विरोधात एक फौजदारी तक्रार देखील करणार आहोत.

सबब, ह्या परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या जाहीर नोटीसद्वारे आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने सर्वांना सावध करणे कामी असे कळवत आहोत की श्री जनक कुमार विल्लयतीराम खन्ना, श्री. मनोज जनक खन्ना, सौ. सुमन जनक खन्ना व श्री गौतम जनक खन्ना कुटुंबिय ह्यांनी आणि तथाकथित अखत्यारी श्री गणेश लक्ष्मण कानडे आणि श्री. नोएल सॅमसन चिंचोलकर ह्या सर्व व्यक्तींना गट क्रमांक १४९ या मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क आणि अधिकार प्राप्त झालेले नाहीत. सबब, कोणीही त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून कोणीही असा कोणताही व्यवहार केल्यास अथवा ह्या अगोदर देखील केला असल्यास आमचे अशील अश्या सर्व व्यक्तींच्या विरोधात योग्य तो कोर्ट दरबार करतील आणि त्यानंतर होणाऱ्या परिणामास आणि खर्चास सदर संबंधित व्यक्ती या जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पुणे/वासुंडे
दिनांक :- २८-०१-२०२६

**अॅड. केदार रविंद्र देशपांडे**
फ्लॅट क्रमांक ६३९-तळमजला, लोकमान्य
नगर ईमारत क्रमांक २९-ब लोकमान्य
नगर पोस्ट ऑफीसजवळ, नवी पेठ पुणे- ४११०३०
ईमेल-kedaar12@gmail.com
मोबाईल क्रमांक :-९४२०१७९२२७

अर्जदार तर्फे वकिल अॅड. श्रध्दा समीर केळकर

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो., यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज क्र. ६०/२०२५
ने.ता. ६/३/२०२६

**जाहीर नोटीस** **नि. ९/ड**

**१) श्री. पांडुरंग रामचंद्र फळेभाय**
वय ७२ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त
रा. रु.नं. २, रु. नं. ११४५, मुंबई रोड,
भवानी नगर, सह्याद्री सोसायटीच्या विरुध्द,
कल्याण वेस्ट, कल्याण डी.सी. ठाणे, महाराष्ट्र ४२१ ३०१ — अर्जदार
सध्या राहणार
दांडा कोळीवाडा, श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड.

**२) श्रीम. अर्चना जितेंद्र चोगले**
वय ४९ वर्षे, धंदा - गृहिणी रा. दांडा कोळीवाडा, श्रीवर्धन
ता. श्रीवर्धन जि. रायगड.

**विरुध्द**

**१ श्री. किरण प्रकाश फळेभाय**
वय-५१ वर्षे, धंदा-नोकरी

**२ श्री. तुषार प्रकाश फळेभाय**
वय-४५ वर्षे, धंदा-नोकरी

**३ श्री. संदीप प्रकाश फळेभाय**
वय-४६ वर्षे, धंदा-मोलमजुरी — सामनेवाला
सामनेवाला क्र. १ ते ३
रा.शांती कुटीर चाळ, शिवाजी नगर,
एस.एस. रोड, भांडुप (वे) ग्रेटर मुंबई,
जी. आर. मुंबई, मुंबई सबरबरन
महाराष्ट्र - ४०० ०७८

**४ श्री. देवेंद्र नारायण चुनेकर**
वय-४१ वर्षे, धंदा-नोकरी

**५ श्रीम. सुप्रिया नारायण चुनेकर**
वय-४९ वर्षे, धंदा -गृहिणी
अर्जदार क्र. ४ व ५
रा. चंद्रेश शॉपिंग भार्केड, नवघर रोड,
भाईंदर ईस्ट, मीरा भाईंदर, ठाणे,
महाराष्ट्र ४०१ १०५

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- दांडा कोळीवाडा, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत वडिल कै. रामचंद्र गोपाळ फळेभाय यांचे दिनांक २५/०७/१९८४ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार व सामनेवाला आहेत. मयत कै. रामचंद्र गोपाळ फळेभाय यांचा मु.श्रीकांत पोलेकर मार्ग, एम.एस.एस. लेन, भरत बिल्डींग नं. ११, पहिला मजला, आर.एन ११, मुंबई येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधनानंतर त्याच्या पश्चात अर्जदार व सामनेवाला यांचे नाव शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढ्या, पतसंस्था दाखल करणे करिता अर्जदार व सामनेवाला हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १९/१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता.१९/१/२०२६

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

# भारतीय संघाचा विश्वविक्रम

## टी-२० इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील पहिला संघ



**। गुवाहाटी । वृत्तसंस्था ।**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील गुवाहाटीमधील टी-२० सामन्यात टीम इंडियाचा दबदबा पाहायला मिळाला. टीम इंडियाने ८ विकेट्सने तिसरा सामना जिंकत मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी मिळवली. यासह टीम इंडियाने वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला.

भारतीय संघाने न्यूझीलंडने दिलेलं १५४ धावांचं लक्ष्य अवघ्या १० षटकांत गाठलं. यासह भारताने ६० चेंडू शिल्लक ठेवत टी-२०मधील सर्वात मोठा विजय नोंदवला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने घरच्या मैदानावर सलग १०वी टी-२० मालिका जिंकली आहे. भारतीय संघाने घरच्या मैदानावर सलग १०वी टी २० मालिका जिंकली आहे.

भारतीय संघ पहिल्या क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर आहे, ज्याने घरच्या मैदानावर सलग आठ टी-२० मालिका जिंकल्या आहेत.

### भारतीय संघाचा वर्ल्ड रेकॉर्ड

टीम इंडियाने १५४ धावांचे लक्ष्य फक्त ६० चेंडूत पूर्ण करून वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पूर्णवेळ खेळणाऱ्या देशाविरुद्ध पूर्णवेळ खेळणाऱ्या देशाने केलेला १५० पेक्षा जास्त धावांचा हा सर्वात जलद पाठलाग आहे. भारतीय संघ हा सर्वाधिक चेंडू शिल्लक ठेवत एखाद्या संघाविरूद्ध विजय मिळवणारा पहिला संघ ठरला आहे.

### घरच्या मैदानावर सर्वाधिक सलग मालिका विजय

- १० मालिका विजय भारत (२०२२-२६)
- ८ मालिका विजय ऑस्ट्रेलिया (२००६-१०)
- ७ मालिका विजय भारत (२०१९-२२)
- ५ मालिका विजय पाकिस्तान (२००८-१८)

### सर्वाधिक चेंडू शिल्लक ठेवत १५० अधिक धावांचं लक्ष्य गाठणारे संघ (पूर्ण सदस्य संघ)

- **६० चेंडू:** भारत विरुद्ध न्यूझीलंड, गुवाहाटी, २०२६
- **३७ चेंडू:** वेस्ट इंडिज विरुद्ध दक्षिण आफ्रिका, किंग्स्टन, २०२४
- **३३ चेंडू:** इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान, लाहोर, २०२२
- **३२ चेंडू:** दक्षिण आफ्रिका विरुद्ध इंग्लंड, जोहान्सबर्ग, २०१६

# निवडक

## डॉन ब्रॅडमन यांनी गिफ्ट केलेल्या टोपीचा लिलाव

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज फलंदाज डॉन ब्रॅडमन यांच्या टोपीला लिलाव करण्यात आला आहे. या लिलावात



ही टोपी चक्क ४६०,००० डॉलर इतक्या प्रचंड किमतीला विकली गेली आहे. ब्रॅडमन यांच्या टोपीसाठी आतापर्यंत लागलेली ही सर्वात मोठी बोली आहे. ब्रॅडमन यांनी आपल्या कारकिर्दीत ९९.९४ या अद्वितीय सरासरीने ६,९९६ धावा केल्या आहेत. ही ऐतिहासिक टोपी ऑस्ट्रेलिया डेच्या दिवशी गोल्ड कोस्ट येथे लिलावात विकण्यात आली. ब्रॅडमन यांनी ही कॅप १९४७४८ मध्ये भारताविरुद्ध झालेल्या मालिकेदरम्यान माजी भारतीय क्रिकेटपटू एस. डब्ल्यू. सोहोनी यांना भेट म्हणून दिली होती. तब्बल ७८ वर्षे जुनी असलेल्या या टोपीसाठी आता २.९२ कोटी रुपयांची बोली लावण्यात आली आहे. त्यामुळे सर्वांचा आश्चर्याचा धक्का बसला आहे. ब्रॅडमन यांच्या काळातील बॅगी ग्रीन कॅप्स अत्यंत दुर्मीळ असून, आज मोजक्याच अस्तित्वात आहेत.

## फुटबॉल सामन्यावेळी बेछूट गोळीबार

**मेक्सिको :** मध्य मेक्सिकोतील एका फुटबॉल मैदानात गोळीबाराची घटना घडली असून यात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. एएफपी न्यूज एजन्सीने दिलेल्या वृत्तानुसार मध्य मेक्सिकोतील गुआनाजुआतो या अतिसंवेदनशील भागात ही घटना घडली. या ठिकाणी सतत हिंसाचाराच्या घटना घडत असतात. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार ११ जणांचा मृत्यू झाला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मैदानावर फुटबॉलचा सामना सुरू होता त्यावेळी अचानक गोळीबार झाला. महापौरांनीही या घटनेची माहिती घेतली असून सुरक्षा पथके हल्लेखोरांच्या शोधासाठी रवाना झाली आहेत. गोळीबाराचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत. गोळीबाराच्या घटनेचा अधिक तपास केला जात आहेत. गोळीबाराच्या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. यातील १० जणांचा जागीच तर एकाचा उपचारासाठी रुग्णालयात नेताना मृत्यू झाला आहे. याशिवाय १२ जण गोळीबारात जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार केले जात आहेत. यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आलीय.शहरात वाढत्या गुन्हेगारी घटना आणि गोळीबाराच्या प्रमाणावर महापौरांनी चिंता व्यक्त केली.

## आर्यना सबालेंका उपांत्य फेरीत

**मेलबर्न :** जगातील नंबर-१ खेळाडू आर्यना सबालेंका वर्षातील पहिल्या ग्रँड स्लॅम ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत पोहोचली आहे. मंगळवारी खेळल्या गेलेल्या उपांत्यपूर्व फेरीत तिने १८ वर्षीय अमेरिकन खेळाडू इव्हाना जोविकला सरळ सेटमध्ये ६-३, ६-० असे हरवले. ही तिच्या कारकिर्दीतील १४ वी ग्रँड स्लॅम उपांत्य फेरी आहे.दोन वेळची चॅम्पियन सबालेंकाने पहिला सेट सुमारे एका तासात जिंकला. सामन्यादरम्यान इतकी उष्णता होती की तिच्या विजयाच्या अगदी आधी स्टेडियमचे छत बंद करावे लागले. ही सबालेंकाची सलग चौथी ऑस्ट्रेलियन ओपन उपांत्य फेरी आहे.आता अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी तिचा सामना कोको गॉफ किंवा एलिना स्वितोलिना यांच्यापैकी एकाशी होईल. ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये जानेवारीतील उष्णता खेळाडूंसाठी नेहमीच एक आव्हान राहिली आहे. यापूर्वीही अनेक खेळाडू डिहायड्रेशन किंवा उष्णतेच्या ताणामुळे त्रस्त झाले आहेत. याच कारणामुळे स्पर्धेत प्रगत सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. हीट पॉलिसीनुसार, जेव्हा उष्णतेचा ताण निर्देशांक निर्धारित मर्यादेपेक्षा वर जातो, तेव्हा बाहेरील कोर्टवरील खेळ थांबवला जातो.

## गौतमला अजिंक्यचा 'गंभीर' सल्ला

**नवी दिल्ली :** भारताच्या कसोटी संघाचा माजी कर्णधार अजिंक्य रहाणेने विद्यमान मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरला एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. टी-२० वर्ल्ड कप होईपर्यंत गौतम गंभीरने सोशल मीडियापासून दूर राहावे, असे अजिंक्य रहाणेने सांगितले आहे. गौतम गंभीरने नुकताच एक्स या सोशल मीडिया हँडलवरून काँग्रेसचे नेते, खासदार शशी थरूर यांच्याशी संवाद साधला होता. ज्या लोकांना वाटते मुख्य प्रशिक्षकाकडे सर्वाधिकार असतात, अशा लोकांची मला किव येते, अशास्वरुपाचे विधान गौतम गंभीरने केले होते. क्रिकबझशी बोलताना अजिंक्य रहाणेने सांगितले की, या संवादावर मी इतकेच म्हणेण की, गौतम गंभीरने सोशल मीडियापासून दूर राहावे. ८२२०;त्याला लोक काय बोलतात किंवा काय सांगतात, याची त्याने जास्त काळजी करू नये. त्याने त्याच्या कारकिर्दीत अतिशय चांगल्या पद्धतीने खेळ सादर केला आहे. तसेच आता तो जबाबदाक प्रशिक्षक आहे. हे माझे वैयक्तिक मत आहे. त्याने सोशल मीडियावर दुर्लक्ष करून आगामी टी-२० वर्ल्ड कपकडे लक्ष केंद्रित करावे, असेही अजिंक्य रहाणेने म्हटले.

## रियान परागला संघात मिळणार स्थान?

**नवी दिल्ली :** टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेपूर्वी टीम इंडियाने जबरदस्त कामगिरी केली आहे. न्यूझीलंडविरूद्ध पाच सामन्यांची टी २० मालिका तीन सामन्यानंतर खिशात घातली आहे. त्यामुळे टीम इंडियाचा आत्मविश्वास दुणावला असणार यात काही शंका नाही. पण टी २० वर्ल्डकप स्पर्धे पूर्वी टीम इंडियात एक मोठा बदल होण्याची शक्यता आहे. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर अनफिट आहे. त्याच्या दुखापतीत सुधारणा होईल की नाही याबाबत साशंकता आहे. अशा स्थितीत अष्टपैलू रियान परागचा विचार केला जाण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने सेंटर ऑफ एक्सीलेंसला रियान परागला सामन्यासाठी तयार राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. रियान परागने यो यो टेस्टही पास केली आहे. म्हणजेच त्याचा फिटनेसही चांगला आहे. त्यामुळे वॉशिंग्टनची दुखापत रियान परागच्या पथ्यावर पडेल असं दिसत आहे. त्यामुळे रियान परागला तयार राहण्यास सांगितलं आहे. येत्या दोन तीन दिवसात वॉशिंग्टन सुंदरबाबत निर्णय घेतला जाईल. त्याच्या बदल्यात प्रथम प्राधान्य रियान परागला दिलं जाण्याची शक्यता आहे.

## सुहित जीवन ट्रस्टच्या तीन विद्यार्थ्यांनी गाजवली स्पर्धा



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

नागपूर रामटेक येथे स्पेशल ऑलिंपिक भारत महाराष्ट्र राज्यस्तरीय ॲथलेटिक्स आंतरशालेय स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यातील विविध संस्थांमधून निरनिराळ्या वयोगटांतील एकूण ३२० विशेष खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

रायगडमधील मनीष म्हात्रे याने या स्पर्धेतील १८ वर्षांवरील वयोगटात उल्लेखनीय कामगिरी करत २०० मीटर धावणे सुवर्णपदक, अर्जुन वारे याने १४ ते १८ वयोगटात २०० मीटर धावणे रौप्य पदक तसेच सिद्धीका पाटील हिने ६ ते १२ वयोगटात ५० मीटर धावणे, यामध्ये सुवर्णपदक पटकाविले. त्याच्या या कामगिरीमुळे महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, हरियाणा येथे होणार असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धांसाठी निवड झालेली आहे.

## इंद्रजित सिंह बिंद्रा यांचे निधन



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ क्रिकेट प्रशासक इंद्रजित सिंह बिंद्रा यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रिकेट प्रशासनातील एक सुवर्णकाळ संपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. इंद्रजित सिंह बिंद्रा यांनी १९९३ ते १९९६ या काळात बीसीसीआयचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९८७ आणि १९९६ चा क्रिकेट विश्वचषक भारतात आयोजित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. क्रिकेट क्षेत्रातील अनेक दिग्गज खेळाडू आणि प्रशासकांनी बिंद्रा यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## आधार चषक स्पर्धा उत्साहात संपन्न



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण विभागात सतत होत असलेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबासाठी तसेच दुखापत झालेल्या सीएचए बांधवांसाठी अपघातग्रस्त निधी संकलनासाठी त्याचप्रमाणे विविध सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने मी मराठी मैदान मोठी जुई, उरण येथे सीएचए आधार चषकाचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेला रसिक प्रेषक, तरुण वर्गांचा मोठा उत्तम प्रतिसाद लाभला.दरवर्षी सीएचए आधार चषक या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते व स्पर्धेतील मिळणारी रक्कम अपघातग्रस्तांसाठी व सामाजिक कार्यासाठी वापरली जाते अशा या सीएचए आधार चषकासाठी नागरिकांनी, रसिक प्रेक्षकांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती.विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या स्पर्धेला भेट देऊन सदर स्पर्धेचे व संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी न्हावा शेवा सी एच ए आधार सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी संघ रॉकस्टार मोठीजूई ठरला तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी संघ द्विज इलेव्हन पाले ठरला आहे. या संघावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### झुंझार पोयनाड आयोजित क्रिकेट स्पर्धा

## पोयनाड पोलीस अजिंक्य



- **वितेश कवळेचा उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरव**
- **अमोल घरत ठरला उत्कृष्ट गोलंदाज**

**। पोयनाड । क्रीडा प्रतिनिधी ।**

झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या वतीने देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सोमवारी (दि. २६) झुंझारच्या क्रीडांगणावर टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पोयनाड विभागातील पोलिसांच्या संघा सह पोयनाड व्यापारी असोसिएशनचा संघ, पोयनाड विभागातील महावितरण कंपनीचा संघ व झुंझार वॉरियर्स अशा चार संघानी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन पोयनाडच्या तलाठी कार्यालयाचे माजी मंडळ अधिकारी तथा महाड तालुक्याचे विद्यमान नायब तहसीलदार म हेश लक्ष्मण निकम व पोयनाड पोलीस स्टेशनचे एपीआय विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार खेळविण्यात आली असून स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोयनाडच्या पोलिसांच्या संघाने पोयनाडव्यापारीअसोसिएशनच्या संघाचा १८ धावांनी पराभव करत स्पर्धेत अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे.

अंतिम सामन्यात पोयनाड पोलिस स्टेशनचे एपीआय विजयकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या पोयनाड पोलिसांच्या संघाने प्रथम फलंदाजी करतांना सहा षटकांच्या समाप्तीच्या नंतर आठ गडी गमावत ४८ धावा काढल्या.

पोयनाड व्यापारी असोसिएशनच्या संघाने सह षटकात ७ गडी गमावत ३० धावाच केल्या. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोयनाड व्यापारी असोसिएशनच्या प्रीत चंद्रप्रकाश जैन याला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज पोयनाड पोलीस संघाचे वितेश कवळे तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून अमोल घरत यांना चषक देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी झुंझारचे सचिव किशोर तावडे, खजिनदार दिपक साळवी, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर, सदस्य अजय टेमकर सुजित साळवी, पोयनाड पोलिस स्टेशनचे एपीआय विजयकुमार देशमुख, पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य किशोर जैन, प्रदिप जैन, ऋषिकुमार जैन, आर.डी जैन, अक्षय अग्रवाल, विश्वकुमार नाईक, शैलेंद्र गायकवाड, ॲड.पंकज पंडित यांच्या सह पोयनाडचे व्यापारी व ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाकची सामन्यावर बहिष्कार टाकण्याची धमकी



- **पाकीस्तानचा नवा ड्रामा**
- **आयसीसीची आर्थिक कोंडी करण्याचा डाव**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने बांगलादेशला फुस लावत त्यांना बाहेर पडायला लावले आहे. तसेच आपण मात्र टी-२० वर्ल्डकपमध्ये खेळणार आहे. बहिष्कारचे अस्त्र आयसीसीने पाकिस्तानच्या क्रिकेटच्या मुळावर आल्यानंतर सपशेल नांगी टाकणाऱ्या या देशाने पुन्हा एकदा नव्या नाट्याला सुरुवात केली आहे. बांगलादेश क्रिकेट संघाला विश्वचषकातून बाहेर काढल्याचा राग मनात धरून, पाकिस्तान आता भारतासोबतच्या ग्रुप स्टेज सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा विचार करत आहे.

पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नकवी यांनी यासंदर्भात सूचक संकेत दिले आहेत.बांगलादेशने सुरक्षेच्या कारणास्तव विश्वचषकासाठी भारतात येण्यास नकार दिला होता आणि त्यांचे सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली होती. आयसीसीनेहीमागणीफेटाळूनलावत बांगलादेशला २४ तासांचा अल्टिमेटम दिला. प्रतिसाद न मिळाल्याने आयसीसीने बांगलादेशला स्पर्धेतून बाद केले आणि त्यांच्या जागी स्कॉटलंडचा समावेश केला. या निर्णयामुळे पाकिस्तान चिडला आहे.पाकिस्तानची धमकी सुरुवातीला संपूर्ण स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याची पोकळ धमकी देणाऱ्या पाकिस्तानने आयसीसीच्या कडक कारवाईच्या भीतीने आपला संघ तर जाहीर केला, पण आता ते भारताविरुद्ध न खेळण्याचे हत्यार उपसत आहेत.

१५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना नियोजित आहे. पीसीबीचा असा दावा आहे की, आयसीसीने बांगलादेशवर अन्याय केला असून हा डबल स्टँडर्ड आहे.

पीसीबी अध्यक्ष मोहसीन नकवी म्हणाले, "पंतप्रधान शाहबाज शरीफ सध्या देशाबाहेर आहेत. ते परतल्यानंतरच आम्ही अंतिम निर्णय घेऊ. एका देशाने दुसऱ्या देशाला हुकूम देणे चुकीचे आहे. आम्ही यावर गांभीर्याने विचार करत आहोत.जर पाकिस्तानने भारताविरुद्धचा सामना खेळण्यास नकार दिला, तर त्यांना केवळ दोन गुणांचे नुकसान सोसावे लागेल, परंतु आयसीसीला मोठ्या आर्थिक फटक्याचा सामना करावा लागू शकतो.

### महिला प्रीमियर लीगमध्ये पहिलं शतक | तीन हंगामांची प्रतीक्षा संपली

## नॅट सायव्हर ब्रंटने रचला इतिहास



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मुंबई इंडियन्सच्या फलंदाज नॅट सायव्हर ब्रंटने महिला प्रीमियर लीगमध्ये इतिहास रचला. सोमवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या विजयासाठी आवश्यक असलेल्या सामन्यात नॅट सायव्हर ब्रंटने लीगमधील पहिले शतक झळकावले. तिने ५७ चेंडूत १६ चौकार आणि एक षटकार मारत शतक पूर्ण केले. यासह, ती महिला प्रीमियर लीगची पहिली शतकवीर ठरली. तीन हंगामांच्या प्रतीक्षेनंतर महिला प्रीमियर लीगला अखेर पहिले शतकवीर मिळाले.

या सामन्यात नॅट सीवर ब्रंटने हरमनप्रीत कौरसोबत शतकी भागीदारी केली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी फक्त ७३ चेंडूत १३१ धावांची भागीदारी केली. हरमनप्रीत कौरने ४९ धावा आणि नॅट सीवर ब्रंटने ७५ धावांचे योगदान दिले. महिला प्रीमियर लीग २०२६ चा १६ वा सामना मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात खेळला जात आहे. ने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने निर्धारित २० षटकांत ४ गडी गमावून १९९ धावा केल्या. मुंबई इंडियन्सला सुरुवातीचा धक्का बसला जेव्हा सजीवना सज्जना फक्त ७ धावांवर बाद झाली. नॅट सायव्हर-ब्रंटने शानदार फलंदाजीची सुरुवात करून संघाला सावरले. तिने ५७ चेंडूत १०० धावा करत प्रीमियर लीगमधील पहिले शतक झळकावले. हेली मॅथ्यूजनेही ३९ चेंडूत ५६ धावा करून संघाला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली. कर्णधार हरमनप्रीत कौरने फलंदाजी करताना २० धावा केल्या.

मुंबईचा हा डाव देखील खास होता. कारण संघाने ७ ते १५ षटकांच्या दरम्यान ११२ धावा केल्या, जो इतिहासात कोणत्याही संघाने सर्वाधिक धावा केल्याचा टप्पा आहे.

यासह, महिला प्रीमियर लीगमधील १०५९ दिवस, ३ हंगाम आणि ८१ सामन्यांची प्रतीक्षा संपली आहे. यापूर्वी, या लीगमधील खेळाडू ९९ धावांवर बाद झाल्या आहेत. परंतु त्यांना शतक झळकावण्यात अपयश आले आहे. महिला प्रीमियर लीगमध्ये नऊ खेळाडू नर्व्हस नाइंटीजचे बळी ठरल्या आहेत. त्यामुळे हे शतक खूप खास आहे.महिला प्रीमियर लीगबद्दल बोलायचे झाले तर, नॅट सेवेर्ड ब्रंट ही लीगमधील सर्वात यशस्वी फलंदाज आहे.

तिने ३५ सामन्यांमध्ये ३५ डावांमध्ये ५१.७६ च्या सरासरीने १,३४६ धावा केल्या आहेत. या काळात तिने एक शतक आणि ११ अर्धशतके केली आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)